मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः
म प्र

# हितगुज

अंक ६८❖संपादिकाः डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर (पृष्ठ १२०)❖डिसेंबर २००६ (फक्त खाजगी वितरणासाठी)

दूरध्वनी:२४१५०८८९ (वडाळा, मुंबई ४०००३१); ई-मेलः maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

## संपादकीय भूमिका

प्रिय कुलबांधवांनो,

हितगुजची संपादिका या नात्याने हा माझा पहिला व हितगुजचा अर्थातच ६८ वा अंक आपल्या हातात देतांना मला विशेष आनंद होत आहे. जून २००६ च्या हितगुजमध्ये "५० अंकांची नॉन-स्टॉप वाटचाल -यापुढे काय ?" असा प्रश्न निर्माण करून संपादकत्वाची ही धुरा उणी पुरी बारा वर्षे अव्याहतपणे व समर्थपणे वाहाणाऱ्या आपल्या ल. शं. नी "मानसिक उमेद असली तरी वयाच्या ७३ व्या वर्षी अनिवार्यपणे येणाऱ्या शारीरिक मर्यादा दुर्लक्षित करता येत नाहीत. ही जबाबदारी यापुढे फार काळ पेलणे मला शक्य होईल असे वाटत नाही." असे निर्वाणीचे निवेदन केले आहे. त्याच वेळी "आजवर अनेकदा आवाहन करूनहि संपादन कार्यात सहभागी होण्यासाठी कोणी उत्साहाने पुढे आले नाही. मराठ्यांमध्ये लेखन, प्रकाशन, पत्रकारिता या क्षेत्रातले अनेक जाणकार आहेत. त्यांनी ही जबाबदारी घेण्यासाठी संपर्क साधावा" असे पुन्हा एकदा - आणि अखेरचे - आवाहन केले आहे. आणि

*(पुढील मजकूर पृष्ठ ११ वर)*

## ✷जाहीर निमंत्रण✷

### मराठे प्रतिष्ठान पुणे शाखा दैनंदिनी २००७ चे प्रकाशन व वर्धापन दिन समारंभ

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने गतवर्षापासून दैनंदिनी काढण्यास सुरुवात केली आहे. २००६च्या या पहिल्यावहिल्या डायरीचे सर्व कुलबांधवांनी स्वागतही केले आहे व ती खूप उपयुक्त असल्याचेही अनेकांनी कळवले आहे.

आता वर्ष २००७ ची डायरी आम्ही काढत आहोत. यावर्षीही सदस्यांनी पृष्ठदानाच्या योजनेला चांगला प्रतिसाद दिला आहे. या डायरीमध्ये नवरात्रातील अष्टमीच्या महालक्ष्मी व्रताची माहिती, सुदृढ शरीरासाठी आहाराचे महत्व, वेळेचे व्यवस्थापन, सुजोक पद्धती, पारिजातक-एक अनमोल रत्न अशा विविध विषयांवरील लेख सर्वांनाच उपयुक्त वाटतील याची खात्री वाटते.

या डायरीमध्ये शनिवार, रविवार साठी स्वतंत्र पाने आहेत. डायरीचा प्रकाशन समारंभ व प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापन दिन असा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्याचे ठरविले आहे. यामध्ये मराठ्यांचे जावई डॉ.गिरीश जाखोटिया हे मारवाडी किस्से सांगणार आहेत व श्री .गजानन मराठे त्यांची मुलाखत घेणार आहेत. त्यानंतर माहेरवाशीण सौ. प्रभा गोडबोले व श्री. प्रमोद मराठ्यांचे कुटुंबीय सुगम संगीताचा कार्यक्रम सादर करणार आहेत. *(याच अंकात पृ. १२ वर डॉ. जाखोटियांचा लेख पहा- संपादिका)*

या कार्यक्रमानंतर पृष्ठदाते, जाहिरातदार व देणगीदार यांना डायऱ्या उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच शुल्क रु. १०० घेऊन विक्रीचीहि व्यवस्था केली आहे.

तरी आपण या सर्व कार्यक्रमाला ज्यास्तीत ज्यास्त संख्येने पूर्ण वेळ उपस्थित राहावे व समारंभाची शोभा वाढवावी ही विनंती.

कार्यक्रम विनामूल्य आहे.

आपली
सौ. नीलांबरी मराठे,
पुणे शाखा

-०००-

**कार्यक्रम:**
**सोमवार दि.२५ डिसेंबर २००६**
**वेळ : दुपारी ४ ते ८;**
**स्थळ:गांधर्व महाविद्यालय हॉल, ४९५, शनिवार पेठ, मेहुणपुरा, जोशीबंधू मंगलकार्यालयाजवळ वर्तक आश्रमाशेजारी, पुणे ४११०३०**

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र.ई.७९१८ (मुं.ता.१२-१-१९८१) मराठे उद्योग भवन,आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी,मुंबई ४०००२५. दूरध्वनी:२४३०२४५३ . वेबसाईट : www.marathepratishthan.org

❖ संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी : सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) ; ❖

ई-मेल sitaram_khambete@yahoo.com दूरध्वनी: २६८३६९९४; मोबाईल: ९८२०५३९०३५;

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मागील तिमाहीत १ सप्टेंबर, १३ ऑक्टोबर व १७ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

१ सप्टेंबरची सभा अध्यक्ष श्री आनंदराव यांचे घरी सायंकाळी ५ वा. घेण्यात आली. सौ. नंदिनी यानी सर्व सदस्यांचे स्वागत केले. सभेपूर्वी सौ. पद्मजा मधुसूदन खांबेटे यांनी त्यांच्या २१ वनस्पतींच्या आयुर्वेदीय उपयोगांविषयींच्या दूरदर्शनवर दिलेल्या मुलाखतीची डीव्हीडी सर्वांना पहावयास मिळाली. सभेच्या सुरुवातीस प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, कल्याणचे माजी नगराध्यक्ष व सिडकोचे माजी अध्यक्ष श्री नारायणराव मराठे यांना राष्ट्रपतींचे मेरिटोरियस सर्वीस मेडल मिळाल्याद्दल यथोचित सत्कार करण्यात आला. आपल्या उत्तरादाखलच्या भाषणात नारायणरावांनी नॅशनल व्हॉलंटियर कोअर, समाजकारण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, इत्यादि विविध क्षेत्रातील सक्रिय सहभागाच्या स्फूर्तिदायक आठवणी रंजकपणे सांगितल्या.

कु.संयोगिता मराठे (डेरवण) हिचा रु. ७००० च्या शैक्षणिक मदतीसाठीचा अर्ज मंजूर करण्यात आला.

याच सभेत २९ ऑक्टोबर च्या वार्षिक सभेत ठेवण्यासाठीचे गतसालच्या सभेचे इतिवृत्त, वार्षिक सभेसाठीच्या अहवालाचा व हिशेबपत्रकांचा मसुदा मंजूर करण्यात आला.

त्यानंतर दि.१३ ऑक्टोबरला मराठे उद्योगभवन येथे झालेल्या सभेत श्री कमलाकर जाईल, पुणे यांनी वैद्यकीय मदतीसाठी अर्ज केला होता त्याचा विचार करण्यात आला व त्यांना रु. २५००० ची वैद्यकीय मदत देण्याचे ठरले.

हितगुज डिसेंबर २००६च्या अंकाची पूर्ण जबाबदारी घेण्याचे श्री. सी.गो. खांबेटे यांनी स्वीकारले. निवर्तमान संपादक श्री. ल.शं. मराठे यांच्या प्रदीर्घ संपादकीय कारकीर्दीची गौरवपूर्ण नोंद घेऊन त्यांच्या हितगुज खर्चाला मंजुरी देण्यात आली.

त्यानंतरच्या १७ नोव्हेंबर ला वरील ठिकाणीच भरलेल्या सभेत परिवार सदस्यांकडून आलेल्या प्रतिक्रिया ,शुभेच्छा इ. पत्रांची नोंद घेण्यात आली.त्यापैकी काही उल्लेखनीय पत्रांचा समावेश **सदस्य-संवाद** या सदरात पुढे केला आहे.

**सप्टेंबर २००६ ते नोव्हेंबर २००६ या तिमाहीत प्रतिष्ठानकडे प्राप्त झालेल्या विविध रकमांचा तपशील.**

| पावती. क्र. | देणगीदार | | निधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| मुं. १६५५ | विनायक दामोदर मराठे,(पृ.३७०) | वेरळ | हितगुज वर्गणी | २०० |
| | | | आजीव सदस्य | १०० |
| मुं. १६५६ | संजय मधुसूदन मराठे,(पृ. ८९ ) | बान्द्रा | हितगुज वर्गणी | २०० |
| | | | आजीव सदस्य | १०० |
| मुं. १६५७ | शिल्पा संजय(पृ. ८९ ), | बाद्रा | आजीव सदस्य | १०० |
| मुं. १६५८ | चिंतामण महादेव ( पृ. २२२), (पितृपक्षानिमित्त पितरांचे स्मरणार्थ) | परळ | शिक्षण निधी | १,००० |
| मुं. १६५९ | नारायण ज. जाईल,(पृ.७५५), मातोश्री राधाबाई जन्मशताब्दिपूर्ति निमित्त पुण्य स्मरण | ठाणे | हित. जाहिरात | ५०१ |
| मुं. १६६० | विजया शंतनु मराठे, (पृ.३६५), | मुलुंड | आजीव सदस्य | १०० |
| मुं.१६६१ | विनायक केशव मराठे, (पृ. २०), (८० व्या वाढदिवसानिमित्त) | वरळी | शिक्षण निधी | ५०१ |
| मुं.१६६२ | यशवंत सुरेश ( पृ. ३९९), | माहीम | शिक्षण निधी | १०,००० |
| मुं.१६६३ | मनोहर दामोदर (पृ.२७५) (पिता कै. दामोदर महादेव यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ) | अंबरनाथ | हितगुज निधी | ५०० |
| मुं.१६६४ | अनंत सदाशिव ( पृ. ३६५), (पिता श्री. सदाशिव गोविंद यांच्या पंचाहत्तरीनिमित्त) | मुलुंड | हितगुज निधी | ५०० |
| मुं.१६६५ | *** *?(मनी ऑर्डर पाठविणाऱ्या सदस्याच्या नावाचा शोध चालू )* | | हितगुज वर्गणी | २०० |
| | | | आजीव सदस्य | १०० |
| मुं.१६६६ | सुधाकर विष्णू ( पृ.५८ ), | नागांव | हितगुज वर्गणी | २०० |
| मुं.१६६७ | वामन शिवराम ( पृ.४४४), | कळंब | हितगुज वर्गणी | २०० |
| मुं.१६६८ | दत्तात्रय आत्माराम ( पृ. २८३), | मुलुंड | हितगुज निधी | ५१ |
| मुं.१६६९ | प्रभाकर दामोदर (पृ.१२०), | वडाळा | हित. जाहिरात | ६०० |
| | | | एकूण रु. | १५,१५३ |

**सूचना**: ****प्रतिष्ठान कार्यालयाकडे मनी ऑर्डर करताना संदेश पट्टीवर पाठविणाराने संपूर्ण नांव व पत्ता देणे आवश्यक आहे. (जागे अभावी सही केली नाही तरी चालेल).*

## वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२९ ऑक्टोबर २००६ रोजी सायंकाळी ५ वा. दामले योग केंद्र, माटुंगा रोड, मुंबई ४०००१६, येथे संपन्न झाली. गणसंख्येच्या अभावी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा सुरू झाली. अध्यक्ष श्री. आनंद यशवंत मराठे यांच्या अनुपस्थितीमुळे कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

या सभेत मागील दि. २९ सप्टेंबर २००५ च्या तेविसाव्या वार्षिक सभेचा वृत्तान्त वाचून मंजूर करण्यात आला. कार्यवाह श्री मोहन सदाशिव यांच्या

*(पुढील मजकूर पृष्ठ १५ वर)*

# सभासद वृत्त

## मानसन्मान

***राष्ट्रपतींचे मेरिटोरियस सर्विस मेडल***

कल्याणचे माजी नगराध्यक्ष व सिडकोचे माजी अध्यक्ष नागरी संरक्षण दल, ठाणे समूहाचे मुख्य क्षेत्ररक्षक **श्री.नारायण परशराम** तथा नारायणराव (पृ.१८)**,**यांना राष्ट्रपतींचे मेरिटोरियस सर्विस मेडल महाराष्ट्राचे राज्यपाल मा.एस एम कृष्णा च्या हस्ते राजभवनातील दरबार हॉल मध्ये विशेष समारंभात प्रदान करण्यात आले. यासमारंभाला उपमुख्यमंत्री आर आर पाटील, गृहसचिव ए.पी.सिन्हा, राज्य होमगार्ड्स व सिविल डिफेन्सचे संचालक श्री. चक्रवर्ती व वर्मा आदि उपस्थित होते.

***पुस्तक प्रकाशन***

गोव्याच्या श्री.**कालिदास बाळकृष्ण** (पृ.५४१) यांच्या "माझा शिक्षणनामा " या पुस्तकाचे दिमाखदार प्रकाशन मराठी साहित्य सेवा संघ, सांकळी यांच्या सौजन्याने १२ नोव्हेंबरला झाले त्याची गौरवपूर्ण नोंद घेण्यात आली. या सोहोळ्याला शिक्षणतज्ज्ञ श्री. सुरेश अमोणकर, हे अध्यक्ष तर प्रमुख पाहुणे दै. गोमंतकचे निवासी संपादक मा. सुरेश नाईक आणि वक्ते आदर्श शिक्षक श्री.रमेश गांवस यांची उपस्थिती लाभली .

***गीताप्रचारक 'ज.गो.'***

पद्मनगर, आगाशी-विरार चे 'सुगीता मंडळ' या गीताप्रचाराला वाहून घेतलेल्या संस्थेचे संस्थापक, प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य श्री.जनार्दन गोविंद (पृ.४०५) उर्फ 'ज.गो' यांनी १ डिसेंबर २००६ रोजी गीता-जयंतीच्या निमित्ताने आगाशी परिसरात घेतलेल्या गीताजयंती महोत्सवाचा वृत्तांत पाठविला आहे. उत्तम सजविलेल्या मंडपात सकाळी गुरुजीना बोलावून गीतेची पूजा, तुलसी पत्र अर्पण, व १० व्यक्तींच्या सहभागाने सामुदायिक गीता पठण व दिवसभर ध्वनिवर्धकावरून संपूर्ण गीतेच्या ध्वनिफीतीचा गीता पठण-श्रवणाचा कार्यक्रम, गीता प्रदर्शन, व गीताप्रेसच्या गीतापुस्तकांचे वितरण असे प्रचारकार्य अखंड चालू होते. रात्री सुयोग आपटे व शेखर अभ्यंकर या दोन कीर्तनकारांचे संयुक्त कीर्तन व त्याच वेळी सुगीता मंडळाचे प्रचारपत्र म्हणून 'कृपाछत्र' या पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रमुख अतिथी यशवंत अग्निहोत्री यांच्या हस्ते सानिका प्रकाशन या गुणेश मराठे यांच्या संस्थेतर्फे प्रकाशन करण्यात आले. 'ज.गों.' च्या दोन्ही मुली व मोठा मुलगा या सोहोळ्यासाठी आवर्जून उपस्थित होते. (मात्र आसपासच्या १०-१५ मराठे परिवारातील सदस्यांना खास निमंत्रणे पाठवूनही अत्यल्प प्रतिसाद मिळाला याची 'ज.गों.' नी तीव्र खंत व्यक्त केली.) अशा प्रकारे 'ज.गों.' च्या २५ वर्षांच्या प्रदीर्घ गीता प्रचारकार्याच्या थाटामाटात साजरा झालेल्या महोत्सवाची आगाशीमध्ये चांगलाच ठसा उमटवून सांगता झाली.

***दवाखान्याचे उद्घाटन***

तिस्क-उसगांव (ता. फोंडा), गोवा येथील निवृत्तशिक्षक श्री. **गोविंद नाारायण** (पृ.५४१) यांचे जावई **डॉ. मिलिंद कुलकर्णी** यांच्या आयुर्वेदिक दवाखान्याचे मराठे यांच्याच वास्तूमध्ये दसरा व गांधी जयंती या शुभमुहुर्तावर दि. २ ऑक्टोबर २००६ रोजी नागरिक, शिक्षक, डॉक्टर यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. दवाखान्याची वेळ **बुधवार/रविवार सकाळी ९ ते १** ठेवलेली आहे. तरी या दवाखान्याचा व मराठे यांचे **स्वयंवर वधुवर मंडळ** व **मराठे फर्निचर** यांचाही मराठे परिवार व इतरानी लाभ घ्यावा असे गोविंदराव कळवितात.

## नांदा सौख्यभरे

१. पुण्यातील प्रतिष्ठानचे धडाडीचे कार्यकर्ते कर्नल प्रमोदन प्रभाकर (पृ. ३८८) यांची सुकन्या **वैद्य चि. प्राजक्ता** हिचा विवाह **श्री. मनोहर देवल**, नवी मुंबई ( रा.अलिबाग) यांचे चिरंजीव **डॉ. मंदार** ह्याच्याशी **२ ऑक्टोबर २००६**रोजी दसऱ्याच्या सुमुहूर्तावर पुण्यात थाटामाटाने पार पडला.

२. नागपूरचे श्री. **दत्तात्रय कृष्णाजी (पृ.३३४)** यांची कन्या **चि. भारती** हिचा विवाह वाराणसीचे श्री. **ओमप्रकाश गुप्ता** यांचे सुपुत्र **चि. सौरभ** यांच्या बरोबर **२८ सप्टेंबर २००६** रोजी नागपूर येथे संपन्न झाला.

## अपत्य प्राप्ती

अंबरनाथ येथील सदस्य **श्री. मनोहर दामोदर** (पृ.२७५) यांचा मुलगा **श्री.पराग व सौ.प्राची** पराग यांस दिनांक **२२ऑक्टोबर २००६** रोजी द्वितीय पुत्ररत्न (नांव- पार्थ ) प्राप्त झाले.

## सहवेदना

१. पुण्यातील कुलबांधव ज्येष्ठ उद्योजक **मुकुंद कृष्ण**, ६०,(पृ. २९७) ह्यांचे दि. **२४-१०-२००६** रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचा स्वतःचा रबरनिर्मितीचा कारखाना होता. ते स्वतः अतिशय शांत व मितभाषी होते. त्यांच्या पत्नी अनुराधा हिला त्यांनी नेहमीच गाण्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मागे पत्नी ,दोन मुली ,जावई ,असा परिवार आहे.

२. व ३.गोरेगांव (मुंबई) येथील **नरहरी महादेव** (पृ.३७५) यांचे पक्षाघात व हृदयविकाराने गेल्या वर्षी दि. **७-११-२००५** ला निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी **आशा** यांचेही ६ महिन्याच्या अंतराने दि **१५-५-२००६** ला निधन झाले. (त्यांच्या पश्चात कोणीही नसल्यामुळे त्या रिकाम्या घरात पोहोचणारे हितगुजचे अंक पाहून त्यांचे चुलते श्री. वि. धों. मराठे यानी ६-११-२००६ च्या पत्राने हे वृत्त कळविले आहे-अशासारखी विशेष परिस्थिती असेल तेंव्हा निधनवार्ता कोणीही त्वरित पाठवावी).

४. डोंबिवली येथील सभासद **जनार्दन केशव** (पृ.४९७) यांचे दिनांक **१८-२-२००६** रोजी दुःखद निधन झाले. ते मध्य रेल्वेमध्ये कामाला होते. त्यांच्या पश्चात पत्नी उषा व विवाहित कन्या स्मिता व पुत्र सुनील आहेत.

५. जोगेश्वरी-मुंबई येथील **श्रीम. वीणा मधुसूदन** जोशी (पृ.७४१) ह्यांचे ब्रेन ट्यूमर विकाराने वयाच्या ६७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात् दोन मुलगे-नरेंद्र व रवीन्द्र, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

६. व ७.दादर- मुंबई येथील **रघुनाथ भालचंद्र** (पृ.२४७) यांचे दुःखद निधन दि.**२४-१०-२००६** रोजी झाले.

***(पुढील मजकूर पृष्ठ १ ३ वर)***

# डिप्रेशन -

## महिलांची मानसिक व्यथा

### (उत्तरार्ध)

डॉ. सौ.सीमा श्याम (पृ.४११) पुणे

(**मागील अंक ६७** वरून पुढे

आता आपण डिप्रेशनच्या दुसऱ्या प्रकाराकडे वळूया.

जर "स्ट्रेस डिप्रेशन" असेल - म्हणजे निव्वळ तेच तेच काम केल्याने, एकट्यानेच जबाबदाऱ्या पेलल्याने, घरच्या लोकांचे दुर्लक्ष झाल्यामुळे, अतिश्रमामुळे थकवा आल्यामुळे एक तऱ्हेची तीव्र उदासीनता येते- अशा वेळेस व्यक्तीचे मन कणखर असेल, विवेकी वृत्ती असेल तर दुसऱ्यावर फार अवलंबून राहू नये. स्वतःच आपल्या समस्या सोडवाव्या. घरातील व्यक्तींना आपल्या श्रमांची कल्पना द्यावी व त्यांनी सर्व समजून घेतले तर श्रेयस्कर. नाहीतर स्वतःच स्वतःला मदत करावी. थोडावेळ स्वस्थ बसून "आत्मशोधन" करावे. स्वतःचेच निरीक्षण करून स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्न करावा. आपले काही चुकते आहे का? काही वेगळे वागून उपयोग होईल का? इतरांचे सहकार्य युक्तीने कसे मिळविता येईल? स्वतःच्या वागणुकीत काय फरक करावा? वगैरे सर्व गोष्टींचा विचार करण्याची नितांत गरज असते.

प्रत्येक व्यक्तीला सतत नवीन शिकावे लागते. प्रत्येक नवीन परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे असते. ह्या मानसिक, भावनिक, शारीरिक, आर्थिक परिवर्तनाचा विचार करून एक मध्यम मार्ग निवडायचा असतो. अशा वेळी "नवीन अर्थपूर्ण मैत्री" फार उपयोगी पडते. जुन्या अतिशय जवळच्या मित्र वा मैत्रिणीचा सल्लाही उपयोगी पडतो. आयुष्यातील संकटकाळी ज्यांनी मदत केलेली असते त्यांचा जन्मभर आदर करावा व त्यांचे ऋणी रहावे. त्यांना डावलून कोठल्यातरी हलक्या व्यक्तींशी मैत्री करू नये.

### नोकरीतील टेन्शन कसे टाळावे?

आता हे झाले कौटुंबिक व व्यक्तिगत नात्याबद्दल. हल्ली अनेक स्त्रिया नोकरी, व्यवसाय करतात. त्या ठिकाणीही अनेक ताण तणाव असतात. नोकरी करण्याच्या ठिकाणी कसे वागावे म्हणजे टेन्शन येणार नाही ह्याबद्दल मी काही मुद्दे सुचविते.

जर नोकरीच्या ठिकाणी एके ठिकाणीच बसावे लागत असेल म्हणजे कॉम्प्युटर समोर, टेबलावर लिखाणाचे सतत काम असल्यास, सारखे फोन उचलावे लागत असतील तर स्वतःची बसण्याची ढब विशिष्ट होते. डोळ्यावर ताण येतो, मान, पाठ अवघडल्यासारखी होते, सुस्ती येते. अशा वेळी खालील उपाय मी सुचवीत आहे.

१. प्रयत्नपूर्वक सुस्ती घालविली पाहिजे. मुद्दाम थोडे उभे राहावे, पाय, हात, मान यांना थोडा ताण द्यावा.
२. मधून मधून ताठ बसावे, चेहरा आनंदी ठेवावा व स्वतःशीच स्मित करावे.
३. साधारण तासाने पाणी, फळाचा रस वा सॅलेड खावे, एखादे बिस्किट किंवा फळ खाण्यास हरकत नाही.
४. एक तऱ्हेचा मुद्दाम उत्साह आणावा.
५. ओल्या टॉवेलने मधूनच तोंड पुसावे, कपाळ, डोळे, मान, हात यावर टॉवेलनेच जरा दाब द्यावा.
६. मानेचे साधे व्यायाम करावे.
७. इतर सहकाऱ्यांशी ४-५ मिनिटे काहीतरी बोलावे व नंतर परत आपल्या कामास लागावे.
८. नोकरीच्या ठिकाणी पुरुषांशी फार लगट करू नये.

घरी किंवा कामाच्या ठिकाणी नेहमी आपल्या शरीराची ठेवण (posture) ताठ ठेवावी. खांदे कधीही पुढे झुकलेले नसावे. मान पुढे व खाली झुकलेली नसावी. यामुळे विचित्र व्यक्तिमत्व दिसते. आत्मविश्वास कमी झाल्यासारखा वाटतो. नेहमी ताठ उभे रहावे, शरीराच्या सर्व हालचाली नैसर्गिक व सुबक, सरळ असाव्या. श्वासोच्छ्वास योग्य गतीने व खोल असावा. त्यामुळे मन शांत राहाते. आत्मविश्वास वाढतो. कपडे अंगाबरोबर असावे. फार सैल व घट्ट नसावे. प्रत्येक स्त्रीने पुरुषांशी सभ्यतेने वागावे.

### सभोवतालच्या व्यक्तींशी सुसंवाद

घरी कुटुंबातील व्यक्ती, नातेवाईक तसेच नोकरीच्या ठिकाणी असणाऱ्या इतर सहकाऱ्यांशी वागताना फार काळजी घेतली पाहिजे. सर्वप्रथम आपलं मन प्रसन्न ठेवावं. काळज्या बाजूला सारून द्याव्या. आपले शरीर व हात स्वस्थ ठेवावे. बोलणे मर्यादित व मुद्देसूद असावे. हसणे सुद्धा नैसर्गिक असावे.

वादविवाद टाळावे. काही वेळा गप्प बसण्यात शहाणपणा असतो. ज्या व्यक्तींपासून आपल्याला मानसिक त्रास होतो अशांना टाळावे.

समोरील प्रत्येक व्यक्तीची चपखल परीक्षा करावी व मैत्री नेहमी मध्यम स्वरूपाची ठेवावी.

### स्वतःसाठी वेळ ठेवा

घर व बाहेरील कामाव्यतिरिक्त थोडा वेळ नेहमी स्वतःकरिता ठेवावा. त्यावेळी खालील गोष्टी कराव्या.

१. शांत बसून ध्यान (Meditation) करावे.
२. थोडा वेळ काही मुद्द्यांवर चिंतन करावे.
३. चिंतन केलेले विचार लिहून काढावे. त्यामुळे फार हलके वाटते.
४. थोडा वेळ लहान मुलांशी खेळावे. त्यामुळे प्रसन्नता येते.

५. आनंदी, विनोदबुद्धी जागृत करावी.
६. एकटेच बाल्कनीत बसून सृष्टीकडे, आकाशाकडे सूर्योदय वा सूर्यास्ताकडे पाहावे. येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींकडे अलिप्ततेने पहावे.
७.आवडणारे संगीत ऐकावे.
८.योगासने करावीत.
९.रात्री विचाररहित मन करून शांत झोपावे.
१०.आहार-आहारात फळे, दूध, कोशिंबिरी असाव्या. अशक्तपणा वाटत असल्यास जेवणात एक व्हिटॅमिन्सची गोळी घ्यावी.
११.शरीर स्वच्छ ठेवावे. रोज सकाळी व संध्याकाळी आंघोळ करावी. आपल्याला शोभेल असा हलका मेकअप करावा. सभ्य दिसू असे कपडे घालावेत.

**डिप्रेशन टाळण्याची त्रिसूत्री**

अशा प्रकारे मनाची स्वस्थता ठेवावी. अस्वस्थ वाटले, काही काळज्या असल्या तर त्या मोकळेपणाने घरातील व्यक्तींना सांगाव्या, आणि काही वेळा जवळच्या वा बाहेरच्या व्यक्तींचे सहकार्य मिळाले नाही तर असमाधानी व हताश न होता स्वतःच शांत बसून आधी मी सांगितल्याप्रमाणे सोल्युशन शोधून काढावे.

डिप्रेशन टाळण्याची ही त्रिसूत्री आहे. जगात कोठलीही समस्या अशी नाही की तिचे निराकरण करता येत नाही.

त्यातूनही जर मनावर प्रचंड ताण जाणवला तर दुसऱ्याने नेण्याची वाट न पाहता सरळ मनोविकार तज्ज्ञाकडे जावे. व योग्य ती ट्रीटमेंट त्वरित घ्यावी. असे जर प्रत्येकाने स्वतःकडे नीट लक्ष दिले तर कोणावरही मनोरुग्ण होण्याची पाळी येणार नाही. व आपल्या मार्गाने आनंदाने काल व्यतीत होईल ही मला खात्री आहे.

=0=

## *"Famous quotes"-A*

-by *R M Vidwans (P.623)*

1. *The brain is a wonderful organ. It starts working the moment you get up in the morning and does not stop until you get into the office.*
*- Robert Frost*
2. *The trouble with being punctual is that nobody's there to appreciate it.*
*- Franklin P. Jones*

( continued on page 10 )

## *मदतीसाठी विनम्र आवाहन*

म्हसळे तालुका सार्वजनिक वाचनालय
म्हसळे, जिल्हा रायगड

**विषय: ग्रंथालयावरील नैसर्गिक आपत्ती**

सोसाट्याचा वारा व अतिशय पर्जन्यवृष्टीमुळे शनिवारी दि.१ जुलै २००६ च्या पहाटे पाचच्या दरम्यान म्हसळा (जि. रायगड) पोलिस स्टेशन हद्दीतील वृक्ष वाचनालयाच्या भाड्याच्या इमारतीवर कोसळल्यामुळे वाचनालयाच्या इमारतीचे छप्पर, भिंती कोसळल्या व आतील इलेक्ट्रिक फिटिंग, ट्यूब लाईट्स्, पंखे, फर्निचर तसेच पुस्तके यांचे सुमारे सव्वादोन लाखाचे नुकसान झाले आहे .

जुन्या जंजिरा संस्थान विलिनीकरण मुक्तिसंग्रामाचे प्रमुख स्वातंत्र्यसैनिक कै. केशव सदाशिव खांबेटे (पृ.८६५) यांनी १९५३ मध्ये स्थापन केलेल्या या ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री. संजय केशव खांबेटे यांनी वरील वृत्त पाठवून आपल्याला आर्थिक सहाय्य तसेच ग्रंथ- साठा या स्वरूपात मदतीसाठी आवाहन केले आहे. इच्छुक दात्यानी यासाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री. नरेंद्र केशव खांबेटे,
बी-७६/३८ ,पंतकृपा, शांतीशिला सोसायटी,
लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४ (फोन-२५४३१३९४०)

*आमच्या मातोश्री*

# कै.राधाबाई जनार्दन जाईल

**जन्म:१५-१२-१९०६ मृत्यू:६-९-१९९०**

## *जन्मशताब्दीपूर्ति निमित्त*

## पुण्यस्मरण



**नारायण ज जाईल, सौ. शालिनी जाईल आणि कुटुंबीय**

# You have no mail! Good

Ramakant M Vidwans (P. 623), Mahim

An unemployed man is desperate to support his family. His wife watches TV all day and his three teenage kids have dropped out of high school to hang around with the local toughs. He applies for a janitor's job at a large firm and easily passes an aptitude test.

The human resources manager tells him, "You will be hired at minimum wage of $5.15 an hour. Let me have your e-mail address so that we can get you in the loop. Our system will automatically e-mail you all the forms and advise you when to start and where to report on your first day."

Taken aback, the man protests that he is poor and has neither a computer nor an e-mail address. To this the manager replies, "You must understand that to a company like ours that means that you virtually do not exist. Without an e-mail address you can hardly expect to be employed by a high-tech firm. Good day."

Stunned, the man leaves. Not knowing where to turn and having $10 in his wallet, he walks past a farmers' market and sees a stand selling 25 lb crate of beautiful red tomatoes. He buys a crate, carries it to a busy corner and displays the tomatoes. In less than 2 hours he sells all the tomatoes and makes 100% profit. Repeating the process several times more that day, he ends up with almost $100 and arrives home that night with several bags of groceries for his family. During the night he decides to repeat the tomato business the next day.

By the end of the week he is getting up early every day and working into the night. He multiplies his profits quickly. Early in the second week he acquires a cart to transport several boxes of tomatoes at a time, but before a month is up he sells the cart to buy a broken-down pickup truck. At the end of a year he owns three old trucks. His two sons have left their neighborhood gangs to help him with the tomato business, his wife is buying the tomatoes, and his daughter is taking night courses at the community college so she can keep books for him.

By the end of the second year he has a dozen very nice used trucks and employs fifteen previously unemployed people, all selling tomatoes. He continues to work hard. Time passes and at the end of the fifth year he owns a fleet of nice trucks and a warehouse which his wife supervises, plus two tomato farms that the boys manage. The tomato company's payroll has put hundreds of homeless and jobless people to work. His daughter reports that the business grossed a million dollars.

Planning for the future, he decides to buy some life insurance. Consulting with an insurance adviser, he picks an insurance plan to fit his new circumstances. Then the adviser asks him for his e-mail address in order to send the final documents electronically. When the man replies that he doesn't have time to mess with a computer and has no e-mail address, the insurance man is stunned, "What, you don't have e-mail? No computer? No Internet? Just think where you would be today if you'd had all of that five years ago!"

"Ha!" snorts the man. "If I'd had e-mail five years ago I would be sweeping floors at Microsoft and making $5.15 an hour."

Which brings us to the moral: Since you got this story by e-mail, you're probably closer to being a janitor than a millionaire. Sadly, I received it also.

Please do not lose your inherent ability to be creative & work hard!!

=0=

# मनुविस्मृती

- मनोहर दामोदर (पृ.२७५), अंबरनाथ

*(येथे लोक मनुस्मृती वाचतात. मनुविस्मृती ग्रंथातली काही पाने संशोधन करताना सापडली त्यातील काही वचने लिहीत आहोत. वाचकांनी मनावर घेऊ नये. - संपादिका)*

★ सत्ता आणि सत्य ह्यात सत्य श्रेष्ठ आहे . कारण सत्ता चल आहे सत्य अचल आहे. - मनु ऊवाच

★ नेहमी असेच काम करा की ज्याचा तुम्हाला पुढे पश्चाताप होणार नाही, चुटपूट लागणार नाही. भले त्यामुळे तुमचा त्वरित फायदा होवो न होवो. काही काळानंतर त्याचा फायदाच होणार.

★ खरं बोलल्यावर राग येणाऱ्याला माणूस म्हणावे; राग न येणाऱ्याला संत म्हणावे.

★ गोड बोलणे व फसवणूक ह्या दोन गोष्टी बहुधा हातात हात घेऊनच येतात.

★ लोक जेव्हा तुमच्याकडे मदत मागायला येतात तेव्हा त्यांचे सद्गुण व सत्कृत्ये आठवून त्यांना मदत करा. तुम्ही जेव्हा मदत मागाल तेव्हा आपण त्या योग्यतेचे आहोत का याचा प्रथम विचार करा.

★ तुम्ही सत्वगुणी, रजोगुणी का तामसी आहात हे ठरवायचय तुम्हाला ? जर बिना तिकीट प्रवास कारणाविना करत असाल तर तामसी. जर एकाच रिटर्न तिकीटावर दोन किंवा अधिक वेळा परतीचा प्रवास करत असाल तर रजोगुणी व जर एक रिटर्न तिकीट फक्त एकदाच वापरत असाल तर मात्र सत्वगुणी आहात !

★ तुम्ही शेंगदाणे / खोबरे भाजताना, कुटताना जर खात नसाल तर नक्कीच संयमी, मनावर ताबा ठेवणारे आहात.

★ कलाकाराला व सैनिकाला जात नसते अन् धर्म एकच असतो. कलाकाराचा जनरंजन तर सैनिकाचा देशरक्षण !

=0=

# विद्यार्थी मित्र राष्ट्रपती

प्रेषक-ल. शं. मराठे (पृ.५२०),मुलुंड

जेसल शाह या मध्यमवर्गीय कुटुंबातल्या ७ वीत शिकणाऱ्या १२ वर्षाच्या मुलीने "आपल्या प्रमाणेच आयुष्यांत मोठे होण्याची माझी मनीषा आहे" असे कळवून राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांना त्यांचे लहानपण, शिक्षण यांबाबत काही प्रश्न विचारणारे पत्र पाठवले. राष्ट्रपतींनी तिच्या पत्राला पाठवलेले उत्तर -

" प्रिय जेसल शाह,

तुझं सुरेख पत्र आणि त्यातले विचार वाचून खूप आनंद झाला. माझ्या अनुभवांविषयी तुला हवी असलेली माहिती खाली देत आहे -

१) मी शाळेत जात होतो, तेव्हा फारच कमी पुस्तकं न्यावी लागत असत. स्कूल बॅग, वॉटर बॉटल, खाण्याचा डबा यातलं काहीही नसे. आम्ही सकाळी जेवून जायचो आणि संध्याकाळी चार वाजता शाळा सुटली की मगच खायचो.

२) त्या काळी मी पहाटे चार वाजता उठत असे. मग अरबी भाषेच्या वर्गाला जाई. त्यानंतर गणिताची शिकवणी आणि मग मी वर्तमानपत्रं विकायला तसेच संध्याकाळी पैसे वसूल करायला भावाला मदत करीत असे. आमच्या घरी वीज नव्हती, त्यामुळे रात्री १०.३० वाजेपर्यंत मी घासलेटच्या दिव्याच्या प्रकाशात गृहपाठ करीत असे.

३) वर्गात शिक्षा मलासुद्धा झाली होती. एकदा गणिताच्या तासाला मी मित्राशी बोलत होतो म्हणून. पण ती शिक्षा शिस्त लावण्याच्या दृष्टीने योग्यच होती.

४) मी ग्रामपंचायतीच्या शाळेत शिकलो. तिथे आम्हाला फी भरावी लागत नसे. आता तू जी फी भरते आहेस ना तेवढी भरणं मला परवडण्यासारखंच नव्हतं.

५) माझं काम वेळापत्रकानुसार चाले आणि मी दिवसाला १६-१६ तास कठोर परिश्रम करीत असे.

माझं पुस्तक 'विंग्ज ऑफ फायर' (अग्निपंख) पुस्तकांच्या सर्व मोठ्या दुकानांतून उपलब्ध आहे. मुंबईत तुला ते निश्चितच मिळेल. तुला हृदयरोगतज्ज्ञ व्हायचंय. शाब्बास ! त्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागतील. म्हणजेच १० + २ मध्ये तुला खूप चांगले मार्क्स मिळवावे लागतील. तरच तुला मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळू शकेल. प्रयत्न चालू ठेव. अडचणी आल्या तरी काळजी करू नकोस. यश मिळेपर्यंत सतत प्रयत्न करीत राहा. तुला, तुझ्या आई-बाबांना आणि तुझ्या शिक्षकांना माझ्या शुभेच्छा.

ईश्वर तुझं कल्याण करो."

- ए. पी. जे. अब्दुल कलाम
राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली

=0=

## सात भौगोलिक सत्ये

संकलकः श्री. मोहन सदाशिव (पृ.३६५)

### (१) पृथ्वी

**वय-** ४५० कोटी वर्षे.

**वजन-**६६ वर २० शून्ये शॉर्ट टन किंवा ६ सेक्स्टालियन मेटिक टन.

**आकारमान-** एकूण क्षेत्रफळ १९ कोटी ६९ लाख ५१ हजार चौ.मैल/ ५१कोटी १लाख चौ.किमी जमीन ३०टक्के; पाणी७० टक्के.

**सर्वोच्च शिखर-**माऊंट एव्हरेस्ट ८८४८ मीटर/२९०२८फूट

**सर्वात खोल समुद्र-** मृत समुद्र किनारा १३१०फूट / ३९९मीटर समुद्रपातळीच्या खाली

*(पुढील मजकूर पृष्ठ ८ वर)*

# ।। दोन कविता ।।

डॉ.सीमा श्याम पृ.( ४११) पुणे

## (१) दूरध्वनी

पुन्हा पुन्हा करितोस संभाषण
जगाच्या कोठल्याही मातीवरून
पुन्हा पुन्हा साधतोस जवळीक
तुझ्या प्रेमळ हाकेमधून.

तुझे सोनेरी सुखद बोलणे
मी ही झेलते आत्मियतेने
तुझ्या शब्दांचे मौक्तिक
साठविते हृदयात तन्मयतेने

पुन्हा पुन्हा शब्दांची चाहूल
ऐकते तन्मयतेने
खरंच कां रे ! तुझे वक्तव्य
देते प्रेमसंदेश पूर्णार्याने ?

आतूर होतात कर्ण माझे
ऐकण्या तव मंद हास्य.
अंतर्यामी होते प्रफुल्लित
विसरून माझ्या क्लेशास

आहे आश्रय तुझ्या वाक्यांचा
प्रियकरा, सदोदीत मला
आहे विसावा तुझ्या मैत्रीत
साथही देतो जिव्हाळा,

झेलतात का तुझे शब्द
माझ्याही शब्दांना ?
खरंच ! पेलतात का ते
माझ्याही संवेदनांना ?

सख्या, सांगत जा वेळोवेळी
कशा आहेत तुझ्या भावना ?
हा किमयागार दूरध्वनी
जोडतो दोन्ही हृदयांना

=0=

## (२) चारोळ्या

वागणाऱ्या स्वतःला कधीही सवलत देवू नये
एकदाचूक लक्षात आली की पुन्हा तीकरूनये
कमी अडाणी माणसाला शहाणा समजू नये
आणि शहाण्याचा कदापीही अंत पाहू नये.

कसली ती हिरवळ कसली हिरवी उपवने
कोणतीच न राहिली गारव्याची की कारणे
पावसाच्या धारा नाही ओसंडत आता
सिमेंटच्या फटकाऱ्यांना तोही भिवून होता.

जाता जाता कळले तुझ्या नजरेचे सांगणे
9पुन्हा भेट मला“ हे ही होते त्यात विनविणे
कसे नाही उमजले मज अगोदरच कोण जाणे !
तरीही, जाता जाता पसरले अंगभर चांदणे.

धुरासोबत माझी दुःख
वर आकाशात जायला हवीत
पण, अग्नी असेपर्यंत
धूर अन् दुःख दोन्ही असणारच !

नयनांत साठविलेले ते रंग होते नभीचे
हृदयात गुंफिले होते सुगंध सुमनांचे
तो समीर गुंजतांना श्रवणांत कसा रमला
प्रेमात तुझ्या प्रियकरा हा जीव पुरा गुंतला

=0=

(सात भौगोलिक सत्ये-पृष्ठ ७ वरून )

**(२) महासागरांची खोली**

**सर्वात जास्त खोली**

पॅसिफिक महासागर
मरिआना ट्रेंच-ग्वादच्या नैऋत्येला-
३६१९८ फूट/११०३३ मी.

# हसरे हितगुज-१

गजानन भास्कर (पृ.४२७),घाटकोपर.

## कृतघ्न (?) डॉक्टर

एक दिवस आमच्या फॅमिली डॉक्टरांनी पाटी लावली-
“पैसे रोख-गावच्या रहिवाशांकडून सुद्धा.”

मला आश्चर्य वाटले. तेव्हा डॉक्टरांनी खुलासा केला, “हा बोर्ड मुख्यत्वे माझे गावकरी पण आता मुंबईचे रहिवाशी झालेल्यांकरता आहे. तीस वर्षापूर्वी ग्रामस्थांनी मला वैद्यकीय शिक्षणाकरता मदत केली. मी ती सव्याज परत केली. गावात शाळा, दवाखाना, देऊळ सर्वांना भरपूर मदत दिली. पण अजूनही हे ग्रामस्थ (आता मुंबईकर) फुकट औषध नेतात. आता गावकऱ्यांची संख्या वाढली. ते सुस्थितीत आहेत. ही फुकटेगिरी मला आता महागात पडते.”

त्या नव्या पाटीमुळे त्यांचे काम झाले. पण गाववाले त्यांना आता “कृतघ्न” म्हणतात !


=0=

(पुढील मजकूर पृष्ठ १० वर)

**आजी**

**सौ. लक्ष्मी हरि मराठे**

**यांच्या स्मरणार्थ**



**प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा , मुंबई ४०००३१
सेलः ९८२० २३२ ०८२
दूरध्वनी : २ ४१५ ०८८९

# ओम पर्वत आणि आदि कैलास पदयात्रा

- विंग कमांडर (नि) यशवंत लक्ष्मण (पृ.१०१), पुणे

जून महिन्यात ओम पर्वत आणि आदि कैलास ही ३ आठवड्याची पदयात्रा आम्ही दोघा ज्येष्ठ नागरिकांनी पूर्ण केली. श्री. मोडक वय - ७२ आणि मी, मराठे वय - ७५ हिमालयाच्या तीन भागातील ही यात्रा ३००० फूटापासून साधारण १६००० फूटापर्यंत अर्थात खडतर आहे. शीव तांडवामुळे नवनिर्माण आणि विनाश या क्रिया कशा होत असतात. याचा जवळून अनुभव घेता आला. पंचमहाभूतांचा हा खेळ एकाच वेळी थरारक आणि विलोभनीय आहे.

पांडवांनी द्रौपदीसह वानप्रस्थाश्रम स्वीकारुन याच मार्गांनी आदि कैलासपर्यंत पोहोचताना देह त्याग केला. पांडव पर्वत त्यांचे स्मरण करुन देतो. दक्षराजानी शिव पार्वतीचा अपमान केला. यज्ञ कुंडातून पार्वतीला शंकरानी मोठ्या कैलासला नेले अशी आख्यायिका आहे. यात्रेकरु ओम नमः शिवाय हा घोष सतत करतात. शक्ति आणि साहस टिकून रहाण्यासाठी हा मंत्र उपयोगी ठरतो. हा श्रद्धेचा भाग आहे. पण तिबेट बॉर्डर आधी ७ कि.मी. वर नवी ढांग येथून ओम पर्वत अगदी जवळ दिसतो. या अर्धगोल प्रचंड पर्वतावर ॐ हे कित्येक चौरस मैल अक्षर वर साचलेल्या बर्फामुळे इतकं रेखीव आणि स्पष्ट दिसतं की दैवी शक्तीचाच हा आविष्कार आहे हे प्रत्यक्ष पाहिल्यामुळे खात्री पटते.

ही सर्व यात्रा उत्तरांचलच्या पूर्वेच्या कुमाऊ भागातून आहे. नेपाळ आणि तिबेट सीमा कालीगंगा नदीमुळे आखल्या गेल्या आहेत. जवळच असलेल्या कालापानी गावातील कालीमाता मंदिरासमोरील कुंडातून काली नदीचा शांत उगम होतो आणि १-२ कि.मी. नंतर ह्या नदीचा बेफाम आणि प्रचंड घोंगावणारा प्रवाह सतत यात्रेकरूंना सावधानतेचा इशारा देत राहतो. ३-४ फूट रुंद पर्वताच्या कुशीतील वाटेवरच रहा, थोड्या चुकीची सुद्धा काली नदी गय करणार नाही. हाच तो इशारा ६व्या ते ११व्या शतकात कुमाऊचा सुवर्णकाल होता. येथल्या काट्यूरी आणि चांद राजांनी दक्षिणेतील चालुक्य राजांशी स्पर्धा करीत या भागात उत्तम देवालये बांधली. तिबेट व मध्य भारत व्यापार कुमाऊतून होत असे. ह्या सर्व भागाला आदी शंकराचार्यांनी सुद्धा भेटी दिल्या आणि जागोजागी शिवलिंगाची स्थापना केली.

दिल्लीहून मोठ्या बसने तवा घाट मार्गे, धारचुला हे धवली गंगेवरील व्यापारी शहर व नंतर मांगती पर्यंत लहान बसने प्रवास होतो. हा सर्व भाग देवदार, चिनार, चीड वृक्षांनी आच्छादलेला आणि नितांत सुंदर आहे. वाटेत पाताळेश्वर ही १०० फूट खोल शिवकालीन गुहा व जागेश्वर येथील सुंदर मंदिर बघितली. मांगती नंतर सात दिवसाचा पायी प्रवास सुरु झाला. पर्वतांच्या कुशीत ३-४ फुटी दगडी रस्ता. वर सहा फुटावर अणकुचीदार दगडांचे छत. एक एक पाऊल काळजीपूर्वक टाकावे लागते. मांगतीपासून ४४०० पायऱ्या उतराव्या लागतात. खडबडीत दगडी रस्त्यावरुन सतत हजार दोन हजार फुटांचे चढ-उतार लागतात. एकीकडे खोल दरीमुळे खूप काळजी घेऊन चालावं लागतं. घोडा घेतला तरी खूप चढ किंवा उतार पायीच करावा लागतो. छातीचा भाता आणि धडधड सतत चालू असते. घोड्यावरुन धोका संभवतो. रस्त्यात छिया लेक हे फुलांचं लहानसं एकुलतं पठार लागतं. मे मध्ये विविध रंगी तर जूनमध्ये सर्व रानटी फुलं आणि विषारी झुडुपं असतात. फक्त योग्य दगड मिळाला तरच बसता येतं आणि विश्रांती घेता येते. विंचू गवत आणि नागफणी सर्वत्र दिसते. नागफण रोपाला २ इंच नागासारखा फणा, ३ ते ५ इंच काळी चमकदार जीभ आणि दोन पांढरे दात असतात. सर्वत्र अनोळखी विषारी वनस्पती दिसते, त्यावर बसणं किंवा हात लावणं धोक्याचं असते. घोडे, शेळ्या, गाई, याक या प्राण्यांना काय खायला मिळतं हे कोडंच आहे. या भागात तुरळकच थोड्या सपाट जागा आहेत. तेथे लहानशी खेडी दिसतात. अशा ठिकाणी नाश्त्याची किंवा जेवणाची सोय असते.

सकाळी साडेपाचला बाहेर पडावं लागायचं. साधारण दुपार ३ पर्यंत नव्या ठिकाणी पोचत असून. मांगती, गाला, बुधी, कालापानी, नवी ढांग, कुट्टी व आदि कैलास असा ९२ कि.मी. पायी प्रवास झाला. गोठवणारी थंडी, पाऊस किंवा हलका हिमवर्षाव. दुपारी कातडी सोलणारं ऊन असे सर्व बदल सोसत प्रवास चालतो. ओंकार आणि कैलासाच्या आकर्षणामुळे रोज नवा उत्साह येतो.

या वाटेवर थोड्या हलगर्जीमुळे कैलासवासी होण्याची शक्यता होती. त्याऐवजी १४ दिवसांनंतर यशस्वी कैलासी होऊन परतलो. बाकी यात्रेकरु ५०च्या आतले असतात. त्यामुळे ७० नंतर त्यांच्या बरोबरीने आम्ही दोघे गेलो हा कौतुकाचा विषय ठरला.

=0=

*__हसरे हितगुज पृष्ठ ८ वरून__*

## हसरे हितगुज-२

### २. टॉवर ऑफ पिसा

गजानन भास्कर (पृ.४२७),घाटकोपर.

१९८७ साली केलेल्या सपत्नीक प्रवासातील एक मजेशीर गोष्ट.

आमच्या ग्रुपमध्ये एक "पिणारे" गृहस्थ होते. सिनेमातील "ओम प्रकाश" प्रमाणे त्यांच्याही खिशात सदोदित एक भरलेली बाटली असे. घोट घोट दारू घेऊन सुद्धा ते कधी आडवे पडले नाहीत. अधूनमधून झोक मात्र जाई. इटलीत "झुकता मनोरा" पहाण्यास गेलो असता त्या गृहस्थांना आम्ही "टॉवर ऑफ पिसा" हा फिशपाँड दिला. त्यामुळे ते एवढे खुश झाले की त्यांनी सर्वांना लगेच एक एक पेग दिला.

तो घेऊन माझ्यासारखे नवशिके मात्र ताबडतोब आडवे झाले.

=0=

# अखंड भारत संतांचे एक मार्गदर्शन

- अजित लक्ष्मण (पृ.५४३), खोतोडे, गोवा

*(पाकिस्तान,अफगाणिस्तान, काबुल, इराण, इस्त्रायल, बांगलादेश, तिबेट-लडाख, लंका आणि ब्रह्मदेश इतकी व्यापक "अखंड भारता ची कल्पना या लेखात मांडली आहे.ती मान्य होईलच असे नाही. याविषयी व्यापक चर्चा व्हावी या दृष्टीने वाचकांनी आपापले विचार कळवावे. - संपादक )*

"नमस्ते शारदादेवी काश्मीर पुरवासिनी...." असे म्हणत आपण विद्येची अधिष्ठात्री देवता सरस्वती हिची आराधना करतो. तेव्हा "काश्मीर" हा विद्येच्या अधिष्ठात्री देवतेचे स्थान म्हणून आपल्या राष्ट्राचा मानबिंदु, तसेच उपासनेत धर्म श्रद्धेचा श्रद्धाबिंदु पण आहे. तेव्हा आपल्या राष्ट्राच्या एका अविभाज्य प्रदेशाविषयी वाटाघाटी त्या काय करायच्या? आणि त्यासुद्धा पाकिस्तान सारख्या दुर्बल शत्रुराष्ट्राशी? सबळ राष्ट्राशी तह किंवा वाटाघाटी करताना त्याचा हेतू आपले राष्ट्र त्या राष्ट्राहून सबल होण्यासाठी वेळ मिळावा हा असतो. आपल्या राष्ट्राविषयीची अस्मिता हरवून बसलो म्हणून नव्हे! उदा. चीन हे राष्ट्र सबल असल्यामुळे आपण मुत्सद्दी राजनीतीचा भाग म्हणून त्यांच्याशी संधी किंवा वाटाघाटी करणे बरोबर, पण तसे करतानाही आपल्या राष्ट्राभिमानाची चुणूक आपण दाखवली पाहिजे; वाटाघाटी करणे म्हणजे त्यांचे आक्रमण आपल्या हद्दीत जिथपर्यंत झाले आहे त्या रेषेला मान्यता देणे नव्हे!

तेव्हा आपण काश्मीरविषयी बोलणी करणे किती अयोग्य आहे हे समजले असेलच. बुद्धीची अधिष्ठात्री देवता सरस्वती. बुद्धीचं अधिष्ठान आपला मेंदू. म्हणून शिराला म्हणजे डोक्याला आपल्या

देहाचे उत्तमांग अशी संज्ञा दिली आहे. तेव्हा काश्मीर घालवणे म्हणजे आपला शिरच्छेद केल्यासारखा आहे. तेव्हा पाकिस्तानात "पाकिस्तान आमच्या भारताचा अविभाज्य घटक आहे किंवा नाही " याबद्दल वाटाघाटी करायच्या असतील तर आम्ही तयार आहोत. त्या वाटाघाटीसुद्धा त्यांच्या सुखासाठी आहेत आणि पटले नाही तर आम्ही आज ना उद्या आमच्या राष्ट्राचा तो अविभाज्य भाग पादाक्रांत करून भारताला खंडित नावाचा जो कलंक लागला आहे ते धुऊन टाकणार आहोतच. पण त्यासाठी आम्ही प्रथम भारत हे "धर्मसापेक्ष" राष्ट्र निर्माण करणार आहोत. हिंदु राष्ट्र निर्माण करणार आहोत. तेव्हा वि.हिं.प., भा.ज.प. आदि हिंदु संघटनेच्या नेत्यांनी निदान अशी प्रतिज्ञा करावी की आमच्या देहपातानंतर आमच्या देहाला अग्नी दिल्यावर आमच्या अस्थी तशाच ठेवाव्या आणि अखंड भारताची निर्मिती झाल्यावर अर्थात पाकिस्तान जगाच्या पाठीवरून नष्ट झाल्यावर आमच्या अस्थी सिंधु नदीत समर्पण कराव्या. " नर्मदा, सिंधु, कावेरी, जलेऽस्मिन् सन्निधं कुरू।" असे आपण स्नान करताना म्हणतो, ती आपली पुण्यद अशी सिंधु नदी कुठे आहे?

आणि पुढे जाऊन मला असे म्हणावेसे वाटते की काबुल आणि अफगाणिस्तान हे प्रदेश सुद्धा आमच्या कुंती आणि माद्री यांची जन्मस्थाने आहेत. तेव्हा अखंड भारत निर्माण झाल्यावर भारत आणि काबुल यांच्या सरहद्दीवरील हिंदूनी काबुलच्या गंगेत आपल्या अस्थी विसर्जन करण्याची प्रथा पाडावी आणि काबुलच्या सरहद्दीवरील हिंदूंनी मुलतानमधील म्हणजे मूलस्थानमधील आणि अफगाणिस्तानच्या म्हणजे कंदहाराच्या सरहद्दीवरील हिंदूंनी गोमती सारख्या आमच्या त्या त्या पवित्र नद्यात आपल्या अस्थी विसर्जन करण्याची प्रथा पाडावी. म्हणजे आपल्या राष्ट्राच्या पवित्र सीमेविषयी जागृती राहील.

ही झाली एक बाजू. दुसरी बाजू म्हणजे इराण पर्यंतचा प्रदेश जिंकून तो आपल्या भारताला जोडणे आणि कृतज्ञता म्हणून ज्या आपल्या " पारशी " बांधवांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आमच्या खांद्याला खांदा लावून आम्हाला साथ दिली त्या पार्श्यांचे इराण हे राष्ट्र निर्माण करणे. कारण पूर्वी इराण ही त्यांचीच भूमी होती. मुसलमानांनी सर्वांना बाटवून मुसलमान केले. त्यातील काही पार्शी गुजराथकडील आमच्या संजाण बंदरात उतरले, आम्हीच त्यांना आमच्या देशाशी आणि धर्माशी प्रामाणिक रहाण्याची शपथ देऊन आमच्या राष्ट्रात सामावून घेतले. त्याप्रमाणे पार्शी आपल्या राष्ट्राशी इमान ठेवून वागले तसेच येथील "ज्यू" पण! त्यामुळे इस्त्रायल आणि पार्श्यांचे इराण ही आपली दोन मित्र राष्ट्रे. आमचा त्यांच्यावर विश्वास आहे. कारण गेली हजार वर्षे ते आमच्याशी बंधु या नात्याने राहिले आहेत हे त्यांचे बंधुऋण आपल्याला फेडायचे आहे.

आज दोनतीनशे वर्षे " आर्यलंड" (आर्यलेंड) हा देश आपल्या स्वातंत्र्यासाठी लढत आहे. पण इंग्रज त्यांना स्वातंत्र्य देत नसून त्यांच्यावर अन्यायच करत आहेत. नाही. इंग्रजांनी कुणावर अन्याय केलेला नाही? कुणाचा विश्वासघात केला नाही? कोणा दुर्बल देशावर अन्याय केला नाही? विश्वासघात, अन्याय आणि छळवणूक हा त्यांच्या राष्ट्रनीतीचा मुख्य भागच आहे. अशा आर्यलंडला पण आम्हाला मुक्त करायचे आहे.

आता "सिलोन " म्हणजे लंका. तीसुद्धा आमचीच. रावण हा ब्राह्मणच होता. पण अनीतीने वागत राहिल्यामुळे त्याला राक्षस म्हटले गेले आणि तो सज्जनांचा छळ करू लागल्यामुळे प्रभुरामचंद्रानी त्याच्यावर स्वारी करून लंका जिंकून घेतली आणि त्याचाच भाऊ बिभिषण नीती संपन्न असल्यामुळे त्याला लंकेचा राजा केला.

आता चीनने घेतलेला लक्षक (लडाख) आणि नेपाळचा काही भाग आपल्याला परत मिळवायचा आहे. तिबेटी जनतेचा धर्म बौद्ध आहे असं म्हणतात. गौतमबुद्धाची "आदि शंकराचार्य " यांनी आमच्या दशावतारात नववा अवतार म्हणून गणना केली आहे. तेव्हा बुद्धधर्म हा हिंदु धर्माचाच एक संप्रदाय म्हणून गणला जातो. कालप्रवाहात त्याला धर्म ही संज्ञा दिली गेली. आपले आदरणीय नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हिंदू धर्म सोडायचा नव्हता म्हणून ते बुद्धसांप्रदायिक झाले. नाही तर मुसलमान झाले असते तर त्यांना निजामासारख्यांनी एक कोटी रुपयांचे आमिष दाखविले होते. कारण त्यांना माहीत होते की ह्यांच्या जमातींचे सात कोट लोक पुढे आपल्याला मिळू शकतील. डॉ. आंबेडकर ख्रिश्चन पण झाले नाहीत. होऊ शकले असते, पण त्यांना हिंदू धर्माचा अभिमान होता. फक्त काही उच्चवर्णीय जनतेकडून ते अपमानित झाले. म्हणून बौद्धधर्माचा स्वीकार हा त्यांचा एक रूसवा होता. बुद्धपंथात वर्ण, जात वगैरे नाहीत. सर्वांना समान वागणूक दिली जाते. आपले लोक हा विचार करत नाहीत की आंबेडकर हे अविचारी असते तर काय झाले असते? आपण आपले सात कोटी बांधव अंतरून बसलो असतो. असो.

आता बांगलादेश. पश्चिम पाकिस्तानला आपण जी वागणूक देणार आहोत त्याच वागणुकीने आपण बांगलादेशाचा सत्कार करणार आहोत. आता पुढील विचार ब्रह्मदेशाचा. बहुसंख्य लोक मुसलमान असले तरी ते बाटले गेले आहेत. कारण ते त्यांच्या नावावरुन कळतेच.

"राम", "गणपती" वगैरे देवतांची त्यांच्यात पूजा केली जाते. ते रामायण मानतात. रामाला आदर्श देव मानतात. व्हीएटनामचे पण तसेच आहे. तेव्हा चीनच्या सरहद्दीपर्यंत भारताची सीमा आपल्याला सुशोभित करायची आहे. सोयीचं वाटल्यास थोडा चीनचा भाग त्याला जोडला जाईल.

=0=

**अखंड भारत निर्माण करून एकटा महाराष्ट्र सिंधू नदीला मुक्त करील!**

छे! छे! सारे जग जरी आमचा द्वेष करू लागले किंवा जगाचा जरी आम्हास द्वेष करावा लागला तरी सिंधूचा संबंध आम्ही सोडणार नाही, तोडणार नाही. सिंधूस आम्ही विसरू? सिंधूवांचून हिंदू! पानावांचून कुडी!! अशक्य!!! जोंवर एक तरी हिंदू जिवंत आहे तोवर तो सिंधूस विसरणे शक्य नाही.........

हे सुर सरिते सिंधु,

पूर्वी एकदा पारतंत्र्याच्या बंदिवासातून तुला मुक्त करण्यासाठी ह्या महाराष्ट्राचे चतुरंग सैन्य उत्तर दिशेला चढून गेले आणि म्लेंच्छांना पादाक्रांत करीत त्यांनी अटकेवर भगवा जरिपटका उभारला! त्या तुला इतर कोणीही जरी एकवेळ विसरले तरी हे स्रोतःस्विनी सिंधु, आमचा एकटा महाराष्ट्र उठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावांचून राहाणार नाही!

-स्वातंत्र्यवीर सावरकर

(अभिनव भारत सांगता समारंभातील भाषण- १९५२. पुणे)

प्रेषकः-*डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे , वडाळा*

# अन्न हे पूर्णब्रह्म (की ब्रह्मराक्षस?)

संकलन- लक्ष्मण शंकर (पृ. ५२०)

"जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म" असे म्हणण्याचा प्रघात आहे. मात्र हे विधान पोट भरल्यानंतर नको असताना, केवळ पानांत टाकायचे नाही म्हणून जो खातो त्याला लागू नाही. असे अन्न हे 'पूर्णब्रह्म' नसून 'ब्रह्मराक्षस' आहे. पोट भरल्यानंतर अन्न पानांत टाकणे हे पुण्यप्रद आहे. ते कोणाच्याा तरी पोटांत जाते. आपणच खाल्ले तर मात्र ते 'पाप' आहे. कारण ते आपल्याला 'ताप' देते.(सद्गुरु वामनराव पै)

*(contd from page 5 )*

## *"Famous quotes"-B*

-by *R M Vidwans (P.623)*

3. *Help a man when he is in trouble and he will remember you when he is in trouble again!*
4. *Complex problems have simple, easy to understand wrong answers.*

**( continued on page 13 )**

# मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके ०५-०६

| नांव | पृ.क्र. गांव | प्राप्तांक | पारितोषिक | |
|---|---|---|---|---|
| **अ. माध्यमिक शालान्त परीक्षा (१०वी)** | | | रुपये | |
| १. प्रीता संजय करमरकर | (५२०) बदलापूर | ९३.८६ | ५०० | |
| **गुणवत्ता यादीत १० वी** | | | २५० | |
| २. निखिल शंतनू | (३६५) मुलुंड | ९१.१६ | ३५० | |
| | | | ५०० | ✣ |
| ३. रोहित विवेक | (२२२) वाई | ८५.४६ | ३०० | |
| ४. पल्लवी केशव | (५०६) तुळस | ८४.२६ | २५० | |
| | | | १०० | ❑ |
| ५. प्रीती पुरुषोत्तम | (५२१) बिंबल | ७४.२५ | १५० | |
| | | **अ. एवूकण** | **२,४००** | |
| **ब. उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा (१२वी)** | | | | |
| ६. अनिकेत अशोक | (४२७) घाटकोपर | ८७.१७ | ३५० | |
| | | | २५० | ✶ |
| ७. गिरिजा संजय | (४१६) अमरावती | ७९.३३ | ३०० | |
| ८. ऋता संजय करमरकर | (५२०) बदलापूर | ७८.६७ | ३०० | |
| ९ प्रियंका रामचंद्र | (४९८) तुळस | ७२.३३ | ३०० | |
| १०.जुई जयवंत | (०४०) नालासोपारा | ६० | २०० | |
| | | **ब. एवूकण** | **१,७००** | |
| **क.प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षा** | | | | |
| ११.मृदुला विश्वेश | (२३५) सांगली | ८०.६६ | १५० | |
| | | | २५० | ✶ |
| | | **क. एवूकण** | **४००** | |
| **ड.माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा** | | | | |
| १२.कौस्तुभ अनंत | (०८७) मुलुंड | ७३.३ | १५० | |
| | | | २५० | ✶ |
| | | ड. एकूण | **४००** | |
| **ई.पदविका, पदवी, उच्च पदवी इ.** | | | | |
| १३.ऋचा मिलिंद | (३३१) डोंबिवली | | ३०० | |
| **बी कॉम मध्ये फर्स्ट क्लास** | | | | |
| १४.हर्षद प्रसाद आठवले | (०८७) बोरिवली | ८८.१४ | ३५० | |
| **बी कॉम -कॉलेजमध्ये दुसरा व विद्यापीठात नववा** | | | | |
| १५.देवयानी श्रीपाद | (०८७) डोंबिवली | | ३०० | |
| **बी कॉम मध्ये फर्स्ट क्लास** | | | | |
| १६.केतकी चंद्रकांत | (१००) ठाणे | | ३०० | |
| **बी कॉम मध्ये फर्स्ट क्लास** | | | | |
| १७.रश्मी चंद्रकांत | (१००) ठाणे | | २५० | |
| **एम कॉम मध्ये सेकंड क्लास** | | | | |
| १८.तन्मय अजित चक्रदेव | (७३७) पुणे | ८१.४७ | ३५० | |
| **बी. एससी मध्ये फर्स्ट क्लास-डिस्टिंक्शन** | | | | |
| १९.श्रद्धा विश्वास | (०४०) कुडाळ | ७१ | ३५० | |
| **एम.एससी मध्ये फर्स्ट क्लास-डिस्टिंक्शन** | | | | |
| २०.राहुल रत्नाकर | (४१६) अमरावती | | ५०० | |
| **अमेरिकेत आयोवा स्टेट युनि.मध्ये पी एच. डी** | | | | |
| २१.प्रियरंजन आनंद **बी.ई.** | (११५) गोवा | | ३०० | |
| २२.अवंती श्रीनिवास **बी.ई.** | (३८९) अंधेरी | ७०.४६ | २५० | |
| २३.राधिका वसंत **सी.ए.** | (०९०) विलेपार्ले | | २५० | |
| २४.रवींद्र रामचंद्र खांबेटे | (६९८) दादर | | ३५० | |
| **बी.ई.-डिस्टिंक्शन** | | ई. एकूण | **३,८५०** | |
| | | अ+ब+क+ड+ई. एकूण | **८,७५०** | |

✶ अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक-संबंधित विभागात मराठे परिवारात सर्वप्रथम

✣ गणेश तांत्रिक शिक्षण पारितोषिक-१०वी नंतर अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश

❑ १० वी / १२ वीत परिवारात हिंदी विषयात सर्वाधिक गुण

कविश्रेष्ठ ग. दि. माडगूळकरांच्या **गीतरामायणाचा**

प्रा. सी. भा. दातारकृत **संस्कृतानुवाद**

परिचायक- सी.गो.खांबेटे (पृ.६७६)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य प्रचारक कै. श्री. बाबासाहेब आपटे यांच्या प्रेरणेने भारतीय इतिहास व संस्कृत साठीच्या संशोधनात्मक कार्यासाठी कै. मोरोपंत पिंगळे यांनी "बाबासाहेब आपटे स्मारक समिती" ची स्थापना करून तिच्या माध्यमातून इतिहास विषयक साधनांच्या संकलन कार्याचा १९८० मध्ये शुभारंभ केला. याच कार्याचा एक भाग म्हणून अखिल भारतीय इतिहास संकलन योजनेचे ***सातवे राष्ट्रीय अधिवेशन*** या वर्षी **कुरुक्षेत्र** (हरियाना) येथे विद्या-भारतीच्या गीता परिसर या विस्तीर्ण प्रांगणात भरविण्यात आले होते. भारताच्या ३६ राज्यांतून ४५० च्या वर प्रतिनिधींचा सहभाग असलेल्या या अधिवेशनात यावर्षी *(१) नव्या वैज्ञानिक अभ्यासाने सिद्ध झालेल्या सरस्वती या गुप्त नदीच्या अस्तित्वावर प्रकाश टाकणाऱ्या शोध निबंधांचे* आणि (२)*१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या १५० व्या स्मृतिवर्षा निमित्त प्रान्ता प्रान्तांमधील स्वातंत्र्य संग्राम विषयक नव्या माहितीचे प्रकाशन* हे प्रमुख विषय असून सरसंघचालक श्री. के. सी. सुदर्शन यांचे मार्गदर्शनपर भाषण हे खास आकर्षण होते.

अशा विशेष प्रसंगी माझे परममित्र (विजयनगर, अंधेरी येथील) प्रा. सी.भा.दातार यांनी गदिमाकृत मराठी गीतरामायणाच्या संस्कृत भाषेतील समवृत्त भाषांतराच्या प्रकाशनाचा व गायनाचाही कार्यक्रम याच संस्थेतर्फे संपन्न झाला. संस्कृत भाषेतील या ग्रंथ-निर्मितीमध्ये माझी भूमिका मुख्यत: संगणकीय अक्षरजुळणीपुरतीच मर्यादित होती. असे असूनही प्रा. दातार यांना माझ्या सहभागाचे अप्रूप इतके वाटत असावे की त्यानी मला या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा आग्रह केला व तिकिटांची वगैरे व्यवस्था करून १७ नोव्हेंबर २००६ रोजीच्या माझ्या कुरुक्षेत्रदर्शनाचा योग जुळवून आणला याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. या ग्रंथाचा रसिक वाचकांना परिचय व्हावा व त्याचे महत्त्व किमान मराठे परिवारापर्यंत तरी पोहोचावे यासाठी हा लेखप्रपंच.

सुमारे ५० वर्षापूर्वी शब्दप्रभू कविश्रेष्ठ ग. दि. माडगूळकर आणि स्वरप्रभू सुधीर फडके उर्फ बाबूजी यांच्या संयुक्त आविष्काराच्या स्वरूपात प्रभू रामचंद्रांच्या चरित्राचे पद्यमय गुणगान करणारे गीतरामायण हे काव्य महाराष्ट्रात घरोघर पोहोचविले गेले. दर शुक्रवारी गदिमांनी एक नवीन गीत द्यावे व बाबूजीनी त्यावर संगीत साज चढवून आकाशवाणीच्या पुणे केन्द्रावरून ते ऐकवावे अशा एक पूर्ण वर्षभर अखंड चाललेल्या उपक्रमामुळे ते दिवस (वर्ष १९५५) गीतरामायण श्रवणाने मंतरलेले होते. मनोरंजनाची मर्यादित साधने उपलब्ध असलेल्या त्या काळी गदिमांचे उत्स्फूर्त भावस्पर्शी आणि अर्थवाही शब्द आणि बाबूजींच्या स्पष्ट, अचूक व रसमयतेने ओथंबलेल्या उच्चारांनी रसिक श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत लोकप्रियतेचा कळस गाठला होता. त्यानंतरच्या काळात बाबूजीनी स्वतःच सर्व (स्त्री- पुरुषांच्या आवाजातली) गाणी म्हणत देशातील अनेक लहानमोठ्या शहरांतून कार्यक्रम सादर केले व गीतरामायण अक्षरशः सर्वतोमुखी केले. परिणामी हिंदी, बंगाली, गुजराथी, भोजपुरी, तामिळ, कन्नड, इत्यादि अनेक भाषेत याची भाषांतरे झाली आहेत. मात्र बहुतेक सर्व भारतीय भाषांची जननी असलेल्या संस्कृत भाषेत गीतरामायणाच्या सर्वही गीतांचा समवृत्त अनुवाद झालेला नव्हता. योगायोगाने प्रा. दातार यांच्याशी संपर्क आला व बाबूजींच्या प्रेमळ आग्रहाखातर प्रा. दातारांनी हे काम हाती घेतले. सुमारे दोन वर्षांच्या अवधीत त्यांनी हा समवृत्त अनुवाद पूर्ण केला.

अनुवाद समवृत्त असण्याचा पुन:पुनः उल्लेख अशासाठी की अनुवादित पद्याचे वृत्त मूळ पद्याच्या वृत्ताशी एकरूप असल्याखेरीज अनुवादित पद्य मूळ पद्याच्या चालीत गाता येत नाही. प्रा. दातारांनी मूळ गीतांचा आशय तर अनुवादात आणला आहेच. पण या समवृत्ततेमुळे संस्कृतमध्ये अनुवादित केलेली ही पदे गीतरामायणाला बाबूजींनी दिलेल्या मूळ चाली बरहुकूम गाता येतात.

काही गाण्यांची केवळ ध्रुपदे चाळली तरी मराठी वाचकांना हा संस्कृत आविष्कार किती रंगतदार झाला आहे याचा प्रत्यय येईल. "श्रीरामानी सहज उचलिले धनू शंकराचे" याचा अनुवाद "*श्रीरामेणोद्धतं लीलया रौद्रं शिवचापम् ।*" किंवा "दैवजात दुःखे भरता, दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा" याचा अनुवाद "*दैवजानि दुःखानीति, न दोषो नराणाम्, पराधीनमस्मिन्भुवने जीवनं जनानाम् ।।*" पहा. अथवा "आकाशाशी जडले नाते, धरणीमातेचे; स्वयंवर झाले सीतेचे" चा अनुवाद "*आकाशेनाऽऽबद्धा नूनं, धरणीजननीयम् ।श्रुणुत स्वयंवराख्यानं* " असे सारेच अनुवाद संस्कृतात म्हणताना गायक कलाकाराला किंवा ते गुणगुणणाऱ्या श्रोत्याला दातारांच्या रचनेमुळे चालीत जराही बदल जाणवत नाही, याचा कोणीही अनुभव घेऊ शकतो. आणि हेच या भाषांतराचे खूप मोठे यश आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

गेली दहा-बारा वर्षे दातार सर (प्रा. दातारांच्या अंधेरीमधील संस्कृत क्लासेसमुळे ते याच नावाने येथे सर्वांना परिचित आहेत) यानी या गीतरामायणाचे त्यांच्याच इमारतीत राहाणाऱ्या मिलिंद व माधुरी करमरकर या संगीतक्षेत्रात नांव मिळविलेल्या दांपत्याला, तसेच सौ.सुधा दातार व चि. राजेंद्र दातार या प्रमुख कलाकारांना बरोबर घेऊन संस्कृत गीतरामायणाचे कार्यक्रम अंधेरी,विलेपार्ले, गिरगांव (ब्राह्मणसभा),गोरेगांव, घाटकोपर, ठाणे, नाशिक, म्हैसूर, व आता अगदी कुरुक्षेत्र वगैरे शहरात केले आहेत. शिवाय ही सर्व मराठी व संस्कृत गीते समोरासमोर छापलेल्या पुस्तिका पाहून अथवा प्रत्यक्ष कार्यक्रम ऐकून अनेकांनी प्रतिक्रिया पाठविल्या त्यात दातारांच्या अनुवादाचे खूपच कौतुक केले गेले आहे. विशेष म्हणजे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारीजी व ज्येष्ठ संस्कृत विद्वान डॉ. मो. दि. पराडकर यांचे हिंदीमधील तर केंद्रीय मंत्री मुरलीमनोहर जोशी आणि वाराणसीचे

प्रा. विनोदराव पाठक यांचे संस्कृतमधील विस्तृत व विद्वत्तापूर्ण अभिप्राय या पुस्तकामध्ये छापले आहेत ते अवश्य वाचनीय आहेत. शिवाय या पुस्तकाबरोबरच वितरित करण्यात आलेल्या वर उल्लेखिलेल्या कलाकारांच्या आवाजातील १५ निवडक गीतांच्या ऑडिओ सी.डी.वरचा लोकसभा सभापती मनोहर जोशी यांचा इंग्रजीतील अभिप्रायसुद्धा या ग्रंथात समाविष्ट आहे. तसेच श्री अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे (पृ.२७०) या डोंबिवली येथील परिवार सदस्यांनी दातार सरांना अनेक मोलाच्या सूचना करून हा ग्रंथ अधिक बिनचूक करण्यासाठी उत्स्फूर्त सहाय्य केले त्याचाही दातारांनी विशेष उल्लेख केला आहे. ही गोष्ट समस्त मराठे मंडळीना अभिमान वाटावा अशीच आहे. या ग्रंथाची पृष्ठे १५५ असून मूल्य १०० रुपये आहे. याखेरीज मराठी-संस्कृत गीत पुस्तिका व सी.डी यांचे प्रत्येकी मूल्य रु. ७५ असून ही संस्कृत गीते सादर कारण्यात रुची असणाऱ्या व्यक्ती वा संस्थांना दातार सर विनामूल्य मार्गदर्शन करावयास सदैव तयार असतात. (अशाच प्रकारे जळगांव येथील एका संगीत व संस्कृतप्रेमी समूहाने या गीतांच्या ध्वनिफीतीवरून प्रेरणा घेऊन अलिकडेच दादर, ठाणे, विलेपार्ले येथे सलग तीन कार्यक्रम करून प्रेक्षकांची चांगली दाद मिळविली होती. त्यांच्यापैकी एक कलाकार भगिनी सौ. अंजली हांडे यांचा एक गायिका म्हणून कुरुक्षेत्रच्या कार्यक्रमामध्ये समावेश होता.) आपल्या परिवारातील प्रसिद्ध वा अप्रसिद्ध गायक कलाकारांनी या संधीचा लाभ अवश्य घ्यावा. दातार सरांशी २६८४०३४१ या दूरध्वनीवर अथवा माझ्याशी अन्यत्र दिलेल्या ई-मेलवर संपर्क साधावा. इच्छुकांना हवे असल्यास संपूर्ण पुस्तक किंवा त्यानी निवडलेल्या गीतांची भाषांतरे संबंधित फॉटसह इ-मेलवरसुद्धा त्यांच्याकडे पाठविता येतील. मात्र पुस्तकासाठी तसेच हितगुजच्या या संपूर्ण अंकासाठी सुद्धा आपल्या संगणकावर पेजमेकर (६.५ किंवा ७ किंवा अधिक) सॉफ्टवेअर असणे आवश्यक आहे. या निमित्ताने तरूण पिढीचा हितगुजशी संपर्क वाढावा अशी अपेक्षा आहे. =0=

*(सभासद वृत्त पृष्ठ ३ वरून)*

तसेंच गेल्या वर्षी त्यांच्या पत्नी **आशा** याना दि. **१७-९-२००५** रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात् पुत्र जयंत व सून तसेच कन्या सुप्रिया व जावई असा परिवार आहे.

८. लोकमान्यनगर, माहीम येथील **सुरेश कृष्णाजी** (पृ.६७) यांचे दि. **२६-११-२००६** रोजी अवघ्या साठाव्या वर्षी तीव्र हृदयविकाराने निधन झाल्याचे दुःखद वृत्त त्यांचे चुलते श्री. वि. गो. उर्फ भाऊसाहेब यांचेकडून दूरध्वनीवरून बसला. सुरेश यांचेबरोबर एका कंप्युटर कंपनीमध्ये सी गो.खांबेटे सेवानिवृत्तीनंतर सल्लागार म्हणून वर्षभर एकत्र काम करीत होते. ते अतिशय मनमिळाऊ व तत्परतेने मदत करणारे सहकारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी गायत्री व पुत्र पुनीत असा परिवार आहे.

९. १९८० पासूनचे क्रियाशील कार्यकर्ते गोव्यातील विद्यार्थीप्रिय शिक्षक **मोहन बाळकृष्ण** (पृ.५२०)यांचे पुणे मुक्कामी **३ ऑक्टोबर २००६** रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले. गोव्यात १९८० मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठे परिवार संमेलनात मराठे प्रतिष्ठाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी हे संमेलन घेण्याबातच्या ५-६ सभा झाल्या त्यातली एक मोहनरावांच्याच वेलिंग येथल्या घरी झाली होती. तेव्हापासून सातत्याने ते प्रतिष्ठानच्या कार्याशी निगडित राहिले होते. गोव्यात त्यांच्याच बिंबल गावी अलिकडेच भरलेल्या संमेलनाला ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे येऊ शकले नव्हते. तरीहि शरीर पुण्यात आणि मन बिंबलांत अशी त्यांची स्थिती होती. संमेलनाच्या दिवसांत ते रोज रात्री फोनवर हकीगत जाणून घेत असत. गेली काही वर्षे आठवड्यातून दोनदा डायलिसीसवर असूनही पुण्यातल्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना आवर्जून हजेरी लावल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. जे सोसायचे आहेच ते रडत रडत न सोसता हसत स्वीकारायचे म्हणजे स्वतःबरोबर इतरांचे दुःखही कमी होते अशी त्यांची मनोधारणा होती. त्यांच्या या कष्टप्रद आजाराचा नवपरिचित माणसाला थांगपत्ताही लागू नये अशा तऱ्हेचा हसतखेळत व थट्टाविनोद करीत गप्पा मारण्याचा त्यांचा स्वभाव खरोखर अनुकरणीय होता. साहित्य-संगीत, नाटक सिनेमा यांचा रसास्वाद घेत ते अखेरपर्यंत आनंदाने जगले. न्युमोनियाचे निमित्त होऊन दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये जायचे होते तर आदल्याच रात्री ते घरच्या मंडळींबरोबर सिनेमाला व ५-६ दिवसांपूर्वीच रामदास स्वामींच्या शिवथरघळला जाऊन आले होते.आदर्श लोकप्रिय शिक्षक म्हणून मंगेशीच्या शाळेतून सेवानिवृत्त होऊन पुण्यात पत्नी, दोन्ही मुलगे व सुना,नातवंडे यांच्यासह आजकाल दुर्मिळ होत चाललेल्या एकत्र कुटुंबातून त्याना ओढून नेणारा काळसुद्धा घटकाभर दाराशीच थबकला असेल काय ? असो. मोहनरावांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सारे मराठे परिवारीय सहभागी आहोतच. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो हीच प्रार्थना.

(प्रेषकः ल.शं. -पृ.५२०)

---

(contd from page 10 )

## *"Famous quotes"*-C

-by *R M Vidwans (P.623)*

5. *We must believe in luck. For how else can we explain the success of those we don't like?*
   *-Jean Cocturan*

6 *It is amazing that the amount of news that happens in the world everyday always just exactly fits the news paper.*
   *- Jerry Seinfeld*

(completed)

# श्रीदत्त जन्म कथा

**डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०), वडाळा**

***महाराष्ट्रातील एक प्रमुख उपासना म्हणून दत्तोपासनेकडे आपणास बोट दाखविता येईल. महाराष्ट्रात घरोघरी दत्ताची उपासना होताना आढळते. गुरुवारी दत्तात्रेयांच्या भजनाचा, उपासनेचा कार्यक्रम नेहमी होत असताना दिसतो. " तिन शिरे सहा हात तया माझा दंडवत" अशा थाटात श्रीदत्तात्रेयांची अनेक सुबक व रंगीत प्रकाशचित्रे घरोघरी दिसतात. श्रीगुरुदेवदत्त अशा गुरुतत्त्वाचा आविष्कार त्यांच्या रूपात पाहावयास मिळतो. मार्गशीर्ष पौर्णिमेस दि. ४ डिसेंबर २००६ श्रीदत्तजयंतीचा उत्सव नुकताच पार पडला. त्यानिमित्ताने हा लेख सादर करीत आहे. .. संपादिका***

महाराष्ट्रातील दत्तसंप्रदायाचे प्रणेते श्रीपाद वल्लभ व त्यांचेच अवतार श्री नृसिंह सरस्वती (शके १३००ते १३८०) हे असले तरी दत्त भक्तीचा प्रसार मुख्यत: सरस्वती गंगाधरांच्या गुरुचरित्राने केला.

**गुरुचरित्रकारांची दत्तजन्मकथा**

सरस्वती गंगाधरांनी आपल्या गुरुचरित्राच्या चवथ्या अध्यायात दत्तजन्माची कथा वर्णिलेली आढळते.

अत्रिऋषी हे गुरु संततीचे पीठ असून, अनसूया ही जगदंबा असल्याचे सरस्वती गंगाधरांनी म्हटले आहे. (४-११.१२)अनसूया ही महान पतिव्रता असून तिच्या पातिव्रत्याच्या महात्म्याने इंद्रादि देव भयभीत होतात (४-१५.२३)! आपले माहात्म्य नष्ट होऊ नये म्हणून सर्व देव, 'ब्रह्मा-विष्णु-महेश ' या त्रयमूर्तींकडे जाऊन त्यांना आपले माहात्म्य कायम राखण्यासाठी काही उपाय योजण्याची विनंति करतात.. तेंव्हा ही त्रयमूर्ती भिक्षूंचा वेष धारण करून 'अतिथी' म्हणून अत्रींच्या आश्रमात, अत्री ऋषी स्नानास गेले असताना, अनुसूयेचे सत्त्वहरण करण्यासाठी येतात.(४-२४.२७)

अनसूया त्यांचा यथोचित आदर सत्कार करते.(४-२८.३५). त्यावेळी या त्रयमूर्तींकडून तिच्याकडे भोजनभिक्षेची मागणी होते. परंतू त्यासाठी ते एक अट घालतात.

नग्न होऊनी आम्हांसी । अन्न वाढावे परियेसीं।
अथवा काय निरोप देसी। आम्ही



जाऊं नाही तरी।। (गु.च., ४-३८.४०)

या धर्मसंकटातून बाहेर पडण्यासाठी अनसूया आपल्या पतीचे चिंतन करते.(गु.च. ४-३८.४०) आणि त्यांना निर्भयपणे आश्वासन देत म्हणते:

ऐसे विचारूनि मानसीं । तथास्तु म्हणें तयासी ।

भोजन करा स्वचित्तेसि। वाढीन नग्न म्हणतसे।।.(गु.च., अ. ४ ओवी ४१)

नंतर पतिपरायण अनसूयेने आपल्या पतीचे चिंतन करीत स्वयंपाक तयार करुन त्या अतिर्थीना भोजनास पाचारण केले. या प्रसंगी सरस्वती गंगाधरांनी अद्भुताची निर्मिती चांगली केली आहे. या प्रसंगाचे वर्णन करताना सरस्वती गंगाधर म्हणतात:

पाकस्थाना जाऊनि आपण। चिंतन करी पतीचे चरण।

वस्त्रें फेडुनि झाली नग्न। म्हणे अतिथी बाळें माझी।।४२।।

नग्न होऊनी सती देखा। घेऊनि आली अन्नोदका। तंव तेचि जाहली बाळका। ठायापुढे लोळती।। ४३।। (गु.च., अ. ४)

अतिर्थींची बालके झालेली पाहून अनसूया भयचकित होणे (४-४४), त्या बालकांना तिने नग्नावस्थेतच स्तनपान करणे (४-४५.५०), त्यांना गाणे गाऊन रिझविणे (४-५१.५४), अत्रींचे आश्रमात आगमन आणि त्यांनी अंतर्ज्ञानाने झालेला सर्व प्रकार जाणणे (४-५५,५६), अत्रींनी केलेल्या स्तुतीने त्रयमूर्तींचे प्रसन्न होणे आणि अत्रींना वरदान देणे व अनसूयेच्या पोटी पुत्र म्हणून जन्मास येणे (४-५७.६२), ब्रह्म = चंद्र, विष्णु = दत्त, शिव = दुर्वास याप्रमाणे त्रयमूर्तींचा जन्म (४-६३.६४), नंतर दुर्वासाचे तपश्चर्येस निघून जाणे, चंद्राचे चंद्र मंडळी गमन, आणि 'सर्वं विष्णुमयं जगत् ' असा परमात्मा दत्तात्रेय मात्र अत्रींच्याच घरी राहाणे (४-६५.६८) इत्यादि कथानक सरस्वती गंगाधरांनी आपल्या 'गुरुचरित्र' या ग्रंथात वर्णिलेले आहे, ते पुढीलप्रमाणे:

त्रयमूर्ति तोचि जाण दत्त। सर्व विष्णुमयं जगत्।

राहील धरोनि तुमचे चित्त। श्रीविष्णुमूर्ति दत्तात्रेय।।६९।।

त्रयमूर्ति ऐक्य होऊन। दत्तात्रेय राहिला आपण

*(पुढील मजकूर पृष्ठ १४ वर)*

*(श्रीदत्तजन्मकथा-पृष्ठ १४ वरून)*

दुर्वास चंद्र निरोप घेऊन। गेले स्थाना आपुलाले।।७०।।
अनसूयेच्या घरी देखा। त्रयमूर्ति राहिली मूर्ति एका।
नामदत्तात्रेया ऐका। मूळ पीठ श्रीगुरूंचे।।७१।। (गु.च., अ.४)

**दत्तजन्मकथेचे प्रयोजन**

अशा प्रकारे 'गुरुचरित्र' ग्रंथात दत्तजन्मकथेचे प्रयोजन सांगताना ते म्हणतातः

दत्तात्रेयाचा अवतारू। सांगितला पूर्वापारू।
पुढे मागुनी अवतार जाहले गुरू। कवणे परी निरोपावे।।
विस्तारूनि बाळकासी सांगावे स्वामी प्रीतीसीं ।।७५।।
श्रीगुरुमूर्ति अवतार जाहले कैसी। अनुक्रमे निरोपावे।।७६।।(गु.च., अ ४)

सरस्वती गंगाधरांनी आपली दत्त जन्माची कथा कथन करीत असताना स्वतःची नवीन भर घातली आहे. अत्रि ऋषी सायंकाळी घरी येतात आणि अंतर्ज्ञानाने घडलेला प्रकार जाणतात. ही तीन बालके म्हणजेच त्रयमूर्ती 'ब्रह्मा-विष्णु-महेश' आहेत हे जाणून त्यांची स्तुती करतात.

आता अविद्या मायेच्या अवगुंठनात पडलेल्या त्या त्रिमुर्तीला ही स्तुती कशी कळणार? परंतु अत्रि ऋषींनी केलेल्या या स्तुतीने ही त्रयमूर्ती प्रसन्न होते असे वर्णन सरस्वती गंगाधर करतात.(गु.च., अ४-५७)

येथे, ही 'त्रयमूर्ती' मायातीत असल्याची कल्पना, सरस्वती गंगाधरांनी गृहीत धरलेली असून तीच सर्वशक्तिमान, 'निर्मिती विलय' करणारी शक्ती आहे, हे,मनावर ठसविण्यासाठी ते पुढे एक अद्भुत प्रकार वर्णितातः

अत्रि ऋषींच्या स्तुतीने प्रभावित झालेले हे तिन्ही देव अत्रींसमोर उभे राहतात आणि, 'वर माग!' असे म्हणतात. तिन्ही देव लहान बालके, नुकतीच जन्माला आलेली असताना, अत्रींच्या समोर उभी कशी राहातात? पण हा प्रश्न सरस्वती गंगाधरांना पडत नाही. ही तिन्ही बालके पाळण्यात तशीच राहतात आणि ही त्रयमूर्ती अत्रींच्या समोर स्वतंत्रपणे उभी राहते !

सरस्वती गंगाधर वर्णितातः
बाळें राहिलीं पाळणेंसी । निजमूर्ती ठेले सन्मुखेंसी।
साध साधु अत्रिऋषी। अनसूया पतिव्रता।। (गु.च.,अ. ४-५८)

अत्रिऋषींचा महिमा आणि अनसूयेच्या पातिव्रत्याचा हा प्रभाव ही अद्भुत घटना वर्णन करणारे सरस्वती गंगाधर हेच पहिले ग्रंथकार दिसतात.

ही 'त्रयमूर्ती' म्हणजेच 'श्रीदत्त' असे सरस्वती गंगाधरांनी निश्चयाने सांगितले आहे. उदाहरणार्थः

त्रयमूर्ति तोचि जाण दत्त। (गु.च.,अ.४-६९)त्रयमूर्ति ऐक्य होऊन। दत्तात्रेय राहिला आपण।। (गु.च., अ.४-७०) असे ते म्हणतात.

**भविष्य पुराणाचा आधार**

दत्तजन्माची कथा कथन करीत असताना सरस्वती गंगाधरांनी भविष्य पुराणग्रंथ पाहिला असावा असे वाटते. कारण केवळ भविष्य पुराणातूनच, सरस्वती गंगाधरांनी वर्णन केलेली दत्तजन्मकथा आढळते. सरस्वती गंगाधरांपूर्वी होऊन गेलेल्या कोणत्याही प्राकृत कवीने अशी कथा सांगितलेली आढळत नाही.

परंतु गंमत अशी की, भविष्य पुराणातील वर्णनावरून सरस्वती गंगाधरांच्या गुरुचरित्रातून उगम पावलेली ही दत्तजन्मकथा पुढील काळातील दत्तभक्त कवींनी आपापल्या ग्रंथात किंवा काव्यात रसाळपणे, विस्तृतपणे वर्णिलेली दिसून येते.

गुरुचरित्रात येणारी ही श्रीदत्तात्रेयांची कथा सोडल्यास, श्रीदत्तात्रेयषियक अन्य कोणताही संदर्भ गुरुचरित्रात येतांना आढळत नाही

=0=

*(प्रतिष्ठानवृत्त पृष्ठ २ वरून )*

अनुपस्थितीमुळे उपकार्यवाह हेमन्त अरुण यानी अहवालवाचन केले. त्यांनी त्यातील महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख केल्यानंतर अहवाल मंजूर झाला. त्यानंतर ताळेबंद व जमाखर्चाच्या विशेष बाबी कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर यांनी नजरेस आणून दिल्या. वर्ष २००५-०६ मध्ये सदस्यांकडून विभिन्न निधी, योजना जाहिराती, सदस्यता शुल्क, व हितगुज वर्गणी इत्यादींकरिता प्राप्त रकमांचा तपशील जोडून दाखविला आहे. त्याबद्दल श्री. सी. गो. खांबेटे यांचे कोषाध्यक्षांनी कौतुक केले. सन २००६-०७ साठी हिशेब तपासनीस म्हणून श्री. चद्रकान्त वामन मराठे (पृ. १००) यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. प्रतिष्ठानच्या घटनेत कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या दुरुस्त्यांना मंजुरी देण्यात आली. प्रतिष्ठानचा भावी कार्यक्रम "वास्तुप्रकल्पनिधी" यावर चर्चा झाली.

सभेनंतर २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील विविध परीक्षांमध्ये मराठे परिवारातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानचे ज्येष्ठ व भूतपूर्व कार्यवाह श्री. विनायक केशव मराठे यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले गेले. त्यानंतर त्यापैकी काहीनी आपले मनोगत मांडले आणि पारितोषिके मिळाल्याबद्दल आभार मानून प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी होण्याची व सहकार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. सभेनंतर गरम बटाटेवडे आणि चहापानाचा सर्वांनी आस्वाद घेतला. नुकतीच चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा उत्तीर्ण झालेली पार्ल्याची कु. राधिका वसंत मराठे हिने पेढे वाटून सर्वांची तोंडे गोड केली व समारंभाची सांगता झाली.

=0=

# मी जावई मराठ्यांचा?

डॉ.गिरीश जाखोटिया (-पृ.१२८), विलेपार्ले

लग्नानंतर लगेचच ही घटना घडली. मी माझ्या एका होऊ शकणाऱ्या ग्राहकाला (म्हणजे क्लाएंटला!)फोन करीत होतो. तब्बल वीस वेळा फोन केला पठ्ठ्याला, पण काहीच प्रतिसाद नाही .हा सगळा उपद्व्याप माझी बायको- मंजिरी पहात होती. न राहवून तिने मला दणकावले, "गिरीश, तुला स्वाभिमान वगैरे काही आहे कि नाही? किती वेळा त्या क्लाएंटला फोन करशील? अरे, त्याला तुझ्याशी बोलायचच नसेल. विनाकारण तुझा वेळ नि शक्ती वाया घालवतोयस तू."

मी मंद स्मित करीत म्हटलं, "तो माझा ग्राहक आहे. 'ग्राहकः देवो भवति।' गांधीजी सुद्धा असंच काहीसं म्हणाले होते. ग्राहकाला फोन करण्यात कसला स्वाभिमान दुखावतोय?"

"तसं नाही गिरीश, अरे तू फोन जरुर कर. पण किती वेळा? वीस वेळा फोन करुन तो भेटत नाही. माझा या गोष्टीला आक्षेप आहे." -ती.

"अग, तो प्रतिसाद देईपर्यंत मी फोन करीतच रहाणार. आत्ता तो मला काम देणार नाही. पण भविष्यात केव्हा तरी देईलच की.तो माझ्याशी बोलेपर्यंत मी चिकाटीने त्याचा पाठलाग करीतच राहणार. एकदा तो माझा ग्राहक झाला की पुढे सारे फोन बंद." -मी म्हणालो.

मला आठवतं, माझी बायको म्हणजे पूर्वाश्रमीची मंजिरी दत्तात्रय मराठे (पिता- दत्तात्रय काशिनाथ) या उत्तराने फारशी आनंदलेली नव्हती. तिने नाराजीचाच एक कटाक्ष टाकला होता. त्यामध्ये एक 'मरहट्टपणा' * डोकावत होता! बहुधा तिला नजरेनं सांगायचं होतं, की "आम्ही 'मराठे' तुटलो तरी कधी वाकत नाही. आता तू मराठ्यांचा जावई झाला आहेस. तुला सुद्धा हा मरहट्टपणा अंगिकारला पाहिजे". मी मात्र माझा 'मारवाडी खाक्या' असा सहज सोडायला तयार नव्हतो. बायकोला पटलं की उद्योग व्यवसायात चिकाटी ही लागतेच. ग्राहकाचा पिच्छा पुरविणं म्हणजे 'मार्केटिंग 'चाच एक भाग झाला. उद्योगात पुढं यायचं असेल तर एक नावडता प्रकार अंगिकारावा लागतो (-जो बऱ्याच मराठ्यांना आज तरी पटणारा नसेल.) हा प्रकार म्हणजे 'वाकेन पण तुटणार नाही!'

धिरूभाई अंबानी सुद्धा हेच म्हणायचे, "बडा बननेका नशा है! बडा बननेके लिये मै किसीको भी सलाम कर सकता हूँ।" इतरांना सलाम करीत करीत या अचाट माणसाने सारं जग आपल्या संपत्तीसमोर नमविलं.

म्हणजे मुद्दा असा कि महात्मा गांधीच का 'राष्ट्रपिता ' झाले? स्वातंत्र्यवीर सावरकर किंवा लोकमान्य टिळक अथवा महर्षी धोंडो केशव कर्वे हे राष्ट्रपिता का नाही होऊ शकले? सर्वमान्य नेता होण्यासाठी आणि लाखो अनुयायी मिळविण्यासाठी प्रखर बुद्धिमत्ताच पाहिजे असे नाही. बऱ्याच नावांजलेल्या कंपन्यामध्ये मी पहात आलो आहे की, सामान्य वकूबाची माणसं सरसर वर चढतात नि बुद्धिमान 'बुद्दू' झाल्यागत खालीच राहातात. मग या गोष्टीचा अर्थ तरी काय काढावा ?एखादा बुद्धिवान आहे पण अक्कलवान नाही किंवा हुशार आहे पण चलाख नाही. ही चलाखी जशी वाण्याच्या दुकानात मिळत नाही. ती एकतर जन्मजात असावी लागते किंवा परिश्रमाने अंगी भिनवावी लागते. अशी चलाखी वापरतच कृष्णाने प्रत्येक राक्षसी व्यक्तीला धोबीपछाड मारला होता. हे करण्यासाठी त्याने पुष्कळदा गनिमी कावा वापरला होता. शत्रूला गाफील ठेवण्यासाठी त्याने प्रसंगी रणांगणही सोडले होते. ओळखला जातो!) राजा शिवाजीने सुद्धा बलाढ्य मुघल सेनेला अशाच गनिमी काव्याने सळो की पळो करून सोडले होते. राणा प्रताप हे करू शकला नाही म्हणूनच तो शिवाजीइतका यशस्वी झाला नाही.

तर पुन्हा पहिल्याच मुद्यावर येतो. 'वेडात दौडले वीर मराठे सात' हे एक दोनदा करायला वा गायला ठीक आहे. पुनःपुन्हा वेडात दौडायचं म्हणजे शुद्ध वेडेपणाच. (आता काही मराठ्यांना माझं हे विधान आवडणार नाही. सासरकडची ही मंडळी असल्यामुळे त्यांची नम्र माफी मागतो. आणि हा गनिमी कावा नाही!)* दिल्लीच्या तख्तावर विराजमान व्हायचे म्हणजे 'बनियागिरी' च करावी लागते. सावरकर-यशवंतराव चव्हाण-धनंजयराव गाडगीळ इ. 'थोर' मराठी मंडळीना ही बनियागिरी जमली नाही. (आजचे 'स्वघोषित जाणते राजे' सुद्धा वेगळी चूल मांडूनही पंतप्रधान होऊ शकले नाहीत.) निष्कर्ष काय तर 'चलाखी' पाहिजे. चलाखी म्हणजे 'चतुराई' आणि 'लबाडी'चं बेमालूमपणे केलेले मिश्रण. (हवं तर या मिश्राला 'चाटण ' म्हणा. पण ते जरूर प्रत्येकाला चाटवा!)

आमच्या (!) पार्ल्यात एका गुजरात्याचं मोठ्ठं दुकान आहे. तो पुरणपोळी, थालीपीठ, कडबोळी, बेसनाचे लाडू, शंकरपाळी, तेलपोळी, चकली नि मेथीवडी मराठी माणसांकडून बनवून घेतो नि ' गुजराती ' स्टाईलने 'मस्त ' किंमतीला परत मराठी ग्राहकानाच विकतो. म्हणजे 'तेरा तुझको अर्पण!' (- और 'सचोटी' का किया तर्पण!!). म्हणजे पैसे कमविणं फारसं अवघड नसतंच मुळी. त्यासाठी शंभर ग्रॅम चलाखी, दोनशे ग्रॅम धिटाई, अडीचशे ग्रॅम वेग, आणि पन्नास ग्रॅम जाहिरात; अशा गोष्टी एकत्र करून 'मेतकूट' बनवायचं आणि ते 'जमविण्या' साठी वापरायचं. ( आपण फक्त काय मस्त मेतकूट 'जमवलंय' असा वाक्प्रचार वापरतो. तो आचरणात कितीसा आणतो?)

तेव्हा मराठ्यांच्या या जावयाचं असं नम्र निवेदन आहे की नव्या वर्षापासून असं चलाख व्हायचं. वाकायचं

*(पुढील मजकूर पृष्ठ १७ वर)*

*(मी मराठ्यांचा जावई-पृष्ठ१६वरून)*

पण तुटायचं नाही. पळ काढायचा पण हरायचं नाही. सत्याचे प्रयोग करायचे पण मिरवायला पुढं पुढं रहायचं. आवळा द्यायचा पण कोहळा काढून घ्यायचा. बुद्धी आणि अक्कल एकत्र आणायची नि स्वतःला कमी लेखत जास्तीत फायदे उचलायचे. उगी-उगी रडायचं नि भरपूर पदरात पाडून घ्यायचं. समोरच्याला प्रसंगी म्हणायचं, "बाबारे, तू शाहाणा, तुझा बाप शहाणा, तुझा आज्जा शहाणा. तुझं सारं खानदान शहाणं. तुझ्या या शहाणपणास माझें विनम्र अभिवादन." हे सगळं म्हणत म्हणतच आपलं काम करवून-करून घ्यायचं.

आजची मराठी मुलं बऱ्यापैकी चलाख आहेत. भाबडेपणा त्यांनी केव्हाच मागे टाकून दिलाय. त्यांना डार्विनचा सिद्दांत नीटपणे कळलाय. जो बलवान तोच जगायला लायक. माझी मुलंसुद्धा मराठीच आहेत. ( किंवा 'मारवाडी मराठी' म्हणा हवं तर.) त्यामुळे मी आणि माझी बायको निर्धास्त आहोत. कृष्णाने यशस्वी होण्यासाठी एक अदृष्य 'कॅप' (म्हणजे टोपी) डोक्यावर चढवलेली होती. कॅप म्हणजे सी-ए-पी. सी-चाईल्ड, ए-ॲडल्ट, आणि पी-पेरेंट. कृष्ण हवे तेव्हा हवा तसा टोपीचा अँगल बदलायचा नि वृःष्णगिरी करायचा. तेव्हा समस्त सासरजनहो, हे मारवाडी निवेदन इथेंच संपवितो.

***/ *****(मराठे - मरहट्टे या सामान्य नामांपासून 'मराठे' या विशेष नामापर्यंत उत्क्रांत होता होता तमाम 'मराठे' मंडळींनी बरीच स्थित्यंतरे झेलली आहेत. जांवयाचा आदर राखणे हे सुद्दा त्यात आलेच. तेंव्हा जावईबापू! आम्ही आपली विधाने सामान्य नामाच्या खुंटीवर सुखरूप ठेवून दिली आहेत; त्यामुळे राग नाहीच! मग माफी मागणे देणे कशासाठी ? -संपादक)*

=0=

# सदस्य-संवाद

सी.गो.खांबेटे (पृ.६७६), अंधेरी

**e-mail : (1) sitaram_khambete@yahoo.com**
**(2) maratheparivar@yahoo.co.in**

या नवीन सदराच्या माध्यमातून सदस्यांकडून वेळोवेळी पोष्टाने अथवा ई-मेलने येणाऱ्या सूचना, तक्रारी, अभिप्राय, खुषीपत्रे,शुभेच्छापत्रे यांची नियमितपणे कटाक्षाने नोंद घेतली जाईल तरी आपण आमच्याशी आवर्जून संपर्कात राहावे ही विनंति आहे. ई-मेल पाठविणाऱ्या सदस्याने आपले पूर्ण नाव व पत्ता कळविणे आवश्यक आहे. संगणक वापरणाऱ्या सदस्यांसाठी हितगुजच्या या अंकापासून इच्छुक सदस्यांना ई-मेल ने अंक मागविण्याचा पर्याय देण्यात येत आहे. त्यासाठी संगणकावर पेजमेकर सॉफ्टवेअर (व्हर्जन- ६.५, किंवा ७.० असणे आवश्यक आहे.)ज्या सदस्यांना मराठीमध्ये काम करावयाची माहिती किंवा सराव आहे त्यांनी मराठी मध्ये लेख तयार करून त्यानी वापरलेल्या फॉंटची ॲटॅचमेंट ई-मेलबरोर पाठविणे आवश्यक आहे.

तसेच या अंकापासून एक दोन पाने इंग्रजीसाठी देण्याचा विचार आहे. वानगीदाखल आपले कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांचा इ-मेलवरून प्राप्त You have no mail ! Good हा विनोदी किस्सा या अंकात अन्यत्र छापला आहे. हल्ली बरीच मुले इंग्रजी माध्यमातुन शिकतात त्यामुळे त्यांना आपले हितगुज त्यांच्यासाठी नाही असे वाटू लागण्याची भीती निर्माण होऊ पहात आहे. हे टाळण्यासाठी हितगुजच्या माध्यमातुन काय करता येईल याबद्दल च्या आपल्या सूचना, प्रतिक्रिया अवश्य पाठवाव्या. पुढल्या अंकापासून हितगुजचे स्वरूप अधिकाधिक सदस्याभिमुख करावयाचा प्रयत्न करावयाचा विचार आहे.

मिरज येथील भास्कर दत्तात्रेय-पूर्वीचे वाडा येथील मराठे सर (पृ. २१) यांनी अक ६७ मधील (१) डिप्रेशन-मानसिक व्यथा, (२) न जेवतांच तृप्तीची ढेकर व (३) माहेरवाशीण हे लेख सुरेख व वाचनीय असल्याचा अभिप्राय दिला आहे. शिवाय वार्षिक अहवालाबद्दल, "एकंदरीत आपली जमा व जमेपैकी होणारा खर्च आदर्श पद्धतीचा आहे; मराठे हे आर्थिक बाबतीत प्रामाणिक व काटकसरी आहेत. प्रतिष्ठानच्या एकूण बऱ्याच गोष्टींचे कौतुक करण्यासारखे आहे. बरेच उपक्रम स्तुत्य व प्रामाणिकतेला धरून आहेत." असे मत व्यक्त केले आहे.

अहमदाबादहून श्री. प्रकाश गणेश व सौ.रोहिणी विद्वांस(पृ.६४५)यानी दिवाळीच्या शुभेच्छा व भेटकार्ड पाठविले आहे या सर्व मंडळीस मराठे प्रतिष्ठानतर्फे धन्यवाद व नवीन वर्षासाठी शुभेच्छा!

=0=

## *आगामी अंकात काय वाचाल?*

आगामी अंकांसाठी आमचे कडे आलेल्या खालील साहित्याला यथावकाश प्रसिद्धी दिली जाईल

१. नवा अधिक मास(ललित लेख)- सौ.नीलिमा विष्णू विद्वांस, माणगांव
२. टेन्शन फ्री गंपू(विनोदी कथा)-ग.भा. मराठे, घाटकोपर.
३. आणखी एक नारायण- ग.भा. मराठे, घाटकोपर.
४. मुक्काम पोस्ट परांजपे नगर, बोरिवली पूर्व- जयंत विद्वांस
५. कलेकलेने वाढणारी कला- वि.म. मराठे, सांगली
६. पुनर्भेट(कथा)- विमायक केशव मराठे, वरळी
७. धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे (प्रवासवर्णन) - सी. गो.खांबेटे, अंधेरी

# विवाह पूर्व मार्गदर्शन-काळाची गरज

सौ. मंगला प्रवीण मराठे (पृ.३६१),गोरेगांव प.- मुंबई

विवाह-पूर्व मार्गदर्शन ही कल्पना तशी नवीन आहे. समाजात फारशी रुजलेली नाही. आयुष्यातल्या इतर सर्व गोष्टींसाठी आपण काही ना काही शिक्षण, मार्गदर्शन घेतो. लग्न ही आपल्या आयुष्यातली अत्यंत महत्वाची, संपूर्ण आयुष्य व्यापून टाकणारी अशी गोष्ट आहे . नेमके त्या बाबतीत मुलांना काहीही शिकवले जात नाही. मुलींना जरा तरी किमान काही घरगुती पारंपारिक गोष्टी सांगतात. त्या सुध्दा "उद्या आई वडीलांचा उद्धार नको व्हायला" म्हणून. मुलांना तेही कोणी सांगत नाही. कारण त्यांना काही दुसऱ्या घरी जायचे नसते. पण लग्नानंतर मुलांच्याही आयुष्यात खूप बदल होतो..त्यांनाही अनेक गोष्टी स्वीकारायच्या असतात..सगळ्या नातेसंबधाच्या चौकटी बदलतात. हे बदल सहजपणे समजून घेता येत नाहीत. मुलेच (म्हणजे मुलगे-मुली दोघेही) नाही, तर पालकही गोंधळलेले असतात.

बहुतेक लोकांना वाटते, काय गरज आहे ? जरा जमवून घेतले की सगळे व्यवस्थित होते. पण असे होताना दिसत नाही. छोट्या छोट्या गोष्टींवरुन विसंवाद होतात. मग लोक "हल्लीच्या मुलांना माणसंच नकोत" वगैरे विधाने करतात. " कुटुंब मोडतय " असा आरडाओरडा करतात. पण कितीही आरडाओरडा होत असला तरीही वस्तुस्थिती अशी आहे की कुटुंबसंस्था आणि लग्नसंस्था दोन्हीही लोकांना हव्या आहेत. लग्न टिकवण्यासाठी अनेक तडजोडी करणारे स्त्री पुरुष आपण बघतो. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला घटस्फोटाचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. असे कां ? ही माणसं जमवून घेत नाहीत असे नाही. तर त्यांच्या वाट्याला आलेली तडजोड त्यांना न झेपणारी असते. काही वेळा फसवणूकही झालेली असते. पूर्वीही असे विजोड संसार होते. दुसरा पर्याय नाही म्हणून ते लोक धकवून नेत होते इतकेच. सगळेच संसार सुखाचे होते असे नाही. त्याकाळी सहजीवनाच्या कल्पनाही खूप तोकड्या होत्या. जोडीदाराकडून फारशा साथ संगतीची अपेक्षा नव्हती. वंशाला दिवा हवा, कुंकवाचा धनी हवा, घरात करायला बाईमाणूस हव, लग्नाचा उद्देश इतकाच होता. आता तसे नाही. प्रत्येक क्षणी सहजीवन ही आजची गरज आहे. आज दोघांनाही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व, स्वतःचे काम, स्वतःची दिनचर्या असते. या सगळ्याला बरोबर घेऊन सहजीवन जगायचे आहे. म्हणून जी तडजोड करायची ती आपल्याला झेपणारी असली पाहिजे. पण हे कळणार कसे ? त्यासाठीच विवाह-पूर्व मार्गदर्शन हवे. पोहोणारा माणूस पाण्यात उडी मारण्यापूर्वी स्वतःला कितपत पोहोता येते आणि पाणी किती खोल आहे याचा अंदाज घेतोच. तसेच हे आहे.

लग्न ,संसार, प्रेम या गोष्टी स्वप्नाळू, इंद्रधनुष्यी आहेत. त्या तशाच हव्यात. पण म्हणून जमिनीवरचे पाय सुटू देता नये. जोडीदाराची निवड डोळसपणे करायला हवी. केवळ जात, वय, उंची, पदव्या, रंग अशा बाह्य गोष्टी बघून भागणार नाही. या गोष्टी प्रेम आणि नात्यांमधला ओलावा निर्माण करायला पुरेशा नसतात. दोघांची व्यक्तिमत्वे, स्वभाव जुळतात की नाही हे बघायला हवे

त्यासाठी मुळात आपण स्वतः खरोखर कसे आहोत ? कितपत पुरोगामी आहोत; घराबद्दल, कुटुंबातल्या माणसांच्या भूमिकांबाबत आपल्या मनातले चित्र कसे आहे; आपल्याला कोणत्या गोष्टी खटकतात; कोणत्या गोष्टी आपण चालवून घेऊ शकतो; कोणत्या नाही; हे स्वतःला स्पष्टपणे माहित असायला हवे. म्हणजे तडजोड कशात करायची आहे आणि ती आपल्याला जमेल की नाही त्याचा विचार करता येईल. बऱ्याच वेळा मुला-मुलींना होकार देण्यापूर्वी काय बोलायचे कोणत्या गोष्टी स्पष्ट करायच्या हेच लक्षात येत नाही. मग त्या गृहित तरी धरल्या जातात किंवा जाऊ दे असे म्हणतात. दोन्ही बाबतीत नंतर वाद उद्भवतात. विवाह-पूर्व मार्गदर्शन विवाहेच्छूंना स्वतःची ओळख करून घेण्यास मदत करते.

अशा कार्यक्रमांचा दुसरा फायदा असा होतो की मुली आणि मुलांचा सर्व साधारण दृष्टीकोन एकमेकांना समजतो. त्यातून आपल्या विचारांमधील त्रुटी कमी करता येतात.स्वप्न आणि वास्तवाचा मेळ घालता येतो. केवळ वरपांगी दिखाऊ विषयांच्या मागे न जाता अनुरुप व्यक्तिमत्वाची निवड करता येते. सुसंवादी वैवाहिक जीवनाची हीच खरी सुरवात असते.

विवाह पूर्व मार्गदर्शनाचा एक भाग हा विवाहेच्छूंच्या पालकांसाठी असतो. आपल्याकडे मुलांच्या लग्नात आणि नंतर संसारातही पालकांचा खूप मोठा सहभाग असतो. एकत्र रहात असले तर मुलाचा संसार हा पालकांच्या संसाराचाच एक भाग बनून रहातो पालकांच्या मनातही अनेक शंका कुशंका, भीती आणि काही चुकीच्या कल्पनाही असतात.चांगल्या स्थळाच्या त्यांच्या आणि मुलांच्या कल्पना वेगळ्या असू शकतात. या शंकांचे निरसन अशा कार्यक्रमातून होते. इतर पालकांशी अनुभवांची देवाण घेवाण करता येते. त्याने आपली दृष्टी अधिक व्यापक आणि प्रगल्भ बनू शकते.

अशा पध्दतीने विचार करुन सजगपणे लग्नाचा निर्णय घेतला तर लग्न नक्कीच यशस्वी होईल. असे मार्गदर्शन विवाहेच्छूंना व पालकांना मिळाले तर विजोड विवाह आणि घटस्फोट यांची संख्या निश्चित कमी करता येईल.

काळाची गरज ओळखून विवाह मंडळे, युवक मंडळे, महिला मंडळे अशा सामाजिक संस्थानी हा उपक्रम हाती घ्यायला हवा. लोकांना त्यांच्या परिसरात अशी मदत मिळाली. तर हा विचार समाजात चांगला रुजेल.

=0=

# तिरुपति बालाजी-
# *तुज सगुण म्हणू की निर्गुण रे?*

डॉ.सौ.शशिकला चिंतामणि (पृ.४१), पुणे.

देवदर्शनाचा सुद्धा योग जुळून यावा लागतो. काही वेळा आपण ठरवूनही काही ना काही अडचणीमुळे आपला बेत रहित करावा लागतो. तर काही वेळा अनपेक्षितणे सहजपणे, देवदर्शनाचा लाभ घडतो. दोन वर्षापूर्वी अधिक श्रावण मासात बालाजीच्या दर्शनाचा असाच अचानकपणे योग जुळून आला. तिरुपतीला बालाजीच्या दर्शनासाठी होणारी गर्दी, रांगेत उभे राहावे लागणे वगैरे गोष्टींचे वर्णन पूर्वीपासून ऐकलेले होते.त्यामुळे अचानक ठरलेला हा बेत कसा पार पडेल अशी काळजी वाटत होती. तिरुपतीला पोचताच वर जाण्यासाठी लगेच बस मिळाली. आणि दुपारी दीडच्या सुमारास तिरुमलायला पोचलो. सुदर्शन टोकन घेणे, रहाण्याची व्यवस्था करणे, इ. सोपस्कार पार पडले. दर्शनासाठी दुसऱ्या दिवशी १२ वाजताची वेळ मिळाली होती. संध्याकाळी तिरुमलाय देवस्थान भोवतालचा निसर्गरम्य परिसर पाहिला.

या देवस्थानात नेहमीच गर्दी असते हे ऐकून माहीत होते. त्याप्रमाणे त्या दिवशी सुद्धा गर्दी होतीच. विविध प्रांतातले विविध भाषा बोलणारे, सर्व वयोगटातले स्त्रीपुरुष त्या गर्दीत होते. बालाजींवरील श्रद्धा आणि त्याच्या दर्शनाची उत्कट इच्छा हे सर्वांमधले समान सूत्र. पण या अलोट गर्दीतही देवस्थानने ठेवलेली व्यवस्था कौतुकास्पद आहे. त्या व्यवस्थेनुसार रांगेने जाऊन अखेर श्री बालाजीचे दर्शन घडले. समयांच्या सौम्य प्रकाशात उभी असलेली ती मूर्ती बघताना मन भारावून गेले. आसपास वेंकटरमा गोविंदा असा जयघोष चालूच होता. त्या जयघोहाच्या तालावर त्याची अनेक नावे आठवू लागली.

वेंकटरमणा गोविंदा, श्रीहरी माधव गोविंदा। विष्णु केशवा मुकुंदा, जगदीशा आनंदकंदा।। लक्ष्मीकांता वेल्हाळा , रुक्मिणीरमणा गोपाळा । जानकीजीवन घननीळा तूच जगदीशा कृपाळा ।।

त्या नयनमोहर रूपाने मन अगदी मोहून गेले. आदल्या दिवशी इथे आल्यापासून मनाला दर्शनाचे वेध लागले होते. दर्शन झाल्यानंतर आता कसलेच व्यवधान मागे नव्हते.संध्याकाळी परत बाहेर पडलो. आसमंतात नजर ठरू नये असे निसर्ग वैभव! बघावे तिकडे उत्तुंग पर्वत रांगा,तितक्याच खोल दऱ्या,हिरव्या वृक्षराजीने नटलेला परिसर,समोरच्या पर्वतरांगांवर ओथंबून आलेले, परमात्म्याच्या सावळ्या रंगाशी नाते सांगणारे पावसाळी ढग,मावळत्या सूर्यप्रकाशात उजळून निघालेले महाद्वारावरचे गोपूर,झळाळणारा मंदिराचा कळस. या साऱ्या गूढरम्य वातावरणने मनावर जणू गारूडच केले आणि मनामध्ये विचार आला, आपल्या संतांनी परमात्म्याच्या निर्गुण निराकार रूपाचे वर्णन केलेले आहे.ते निर्गुण, निराकार, असीम रूपच समोर उभे आहे का? उदात्त सौंदर्याची ही अनुभूती हे परमेश्वराचेच दर्शन नव्हे काय?

खरोखर आपले पूर्वज केवढे द्रष्टे होते? आपली श्रद्धास्थाने असलेल्या सर्व देवदेवतांची प्रतिष्ठापना सिर्गरम्य अशा ठिकाणीच केलेली आहे. निसर्गाच्या उदात्त आणि विशाल सौंदर्याचे दर्शन माणसाला व्हावे हाच हेतू त्यामागे असावा. सगुण मूर्तीच्या दर्शनाच्या ओढीने तिथपर्यंत पोचतांना सर्वत्र रुन राहिलेल्या निर्गुण निराकाराचाही त्याला साक्षात्कार घडावा हाच हेतु त्यामागे असावा =0=

*(संपादकीय -पृष्ठ १ वरून)*

समस्त मराठे परिवाराला विचार करावयाला लावले आहे. त्यानंतरच्या कार्यकारिणीच्या २२ जुलैच्या सभेत ही जबाबदारी कार्यकारी संपादक म्हणून स्वीकारण्याची तयारी दर्शविली. मात्र ल.शं.नी सुमारे वर्षभर मार्गदर्शन करावे अशी सूचना केली व ती मान्य झाली.(हितगुज सप्टेंबर २००६ प्रतिष्ठानवृत्त पहा). दरम्यानच्या काळात गेले वर्षभर मी हितगुजसाठी मजकूर तयार करून देणे, वृत्तसंक्षेप करणे, प्रुफे तपासणे या प्रकारची मदत करीत होतेच. या नंतरच्या १३ ऑक्टोबरच्या कार्यकारिणीमध्ये हा विषय नव्याने चर्चेला आला असता, कार्यकारिणी सदस्य श्री. सी. गो. खांबेटे यांनी हितगुजच्या स्वरूपात मोठे बदल करण्याबद्दल व ते अधिक आकर्षक कसे करता येईल याविषयी भूमिका मांडली. यावर चर्चा होऊन नवीन दिशा देण्याबद्दल व हितगुज नियमित प्रकाशित करण्याबद्दलची सर्व जबाबदारी घेण्याचे मान्य केले. त्यानुसार आता ल.शं. ना पूर्णपणे मुक्त करावे व श्री. खांबेटे यांनी डिसेंबर २००६ चा अंक काढावा असे ठरविण्यात आले. कुलबांधवांचे संपर्क माध्यम म्हणजे हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र आहे. कपिगोत्री मराठे, खांबेटे, विद्वांस, जाईल, चक्रदेव, रटाटे, फडणीस इ. सर्व कुलबांधवांचा परिचय, त्यांच्या सुखदु:खाच्या वार्ता, त्यांतील कर्तृत्ववान व्यक्तींची उल्लेखनीय कामगिरी या गोष्टी केवळ हितगुजद्वाराच सर्व कुलबांधवांपर्यंत पोहोचतात. ल.शं. च्या एका तपाच्या प्रदीर्घ संपादकीय कालखंडानंतर माझ्या हाती आलेली ही ज्ञानज्योत त्याच जोमाने तेवत ठेवण्याचे व आपल्या सर्वांच्या सहकार्याने हितगुज अधिकाधिक हवाहवासा वाटेल यासाठी सदैव प्रयत्न करीन असे आश्वासन या निमित्ताने देते व नूतन वर्षाच्या शुभेच्छा देऊन हे पहिलेवहिले संपादकीय संपविते.

### हितगुजची वाटचाल-कहाणी २५ वर्षांची

*-सी.गो.खांबेटे , अंधेरी*

एप्रिल १९८१ ते डिसेंबर १९९३ या तेरा वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातील हितगुजचे पहिले सोळा अंक हे अनियतकालिक या स्वरूपाचे होते. अंक १७ (मार्च १९९४ ) ते अंक ६७(सप्टेंबर २००६)असे ५१ अंक श्री लक्ष्मण शंकर यांच्या एक तपाच्या संपादकत्वाखाली नियतकालिक त्रैमासिक म्हणून प्रसिद्ध झाले. त्यामध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याची सूची क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. सूची कालखंड-१ : अंक १७ (मार्च १९९४) ते अंक ४०(डिसेंबर १९९९) या अंकात पृ. २१ वर छापली आहे. अशाच प्रकारे आजच्या पिढीतील वाचकांच्या माहितीसाठी गेल्या २५ वर्षांतील **(१) जाहितरातदारांची व (२) गुणवत्ता पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची सूची** प्रसिद्ध करावयाचा विचार आहे. या विषयीच्या आपल्या प्रतिक्रियांची अपेक्षा आहे.

# चला चला चित्रकूटला

लेखक-मोहन सदाशिव (पृ.३६५), खार.

प्रभू रामचंद्र १४ वर्षे वनवासात होते. त्यापैकी ११ वर्षे त्यांनी चित्रकूटच्या जंगलात काढली. आजच्या मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश ह्यांच्या सीमेवर हा भाग आहे. आजपर्यंत हा परिसर रामायण काळातच वावरत आहे. मा. नानाजी देशमुख हे याच भागात पं. दीनदयाळ शोध संस्थान मार्फत
सर्वांगीण (ग्रामीण ) विकासाचे काम करत आहेत. नानाजींच्या प्रेरणेने मुंबईच्या जे.जे.स्कूल ऑफ आर्टचे सुहास बहुलकर व त्यांचे सहकारी ह्यांनीचित्रकूटला रामायणिक प्रसंगांचे शिल्प तसेच तैलरंगातील चित्रण असलेले व दर्शनी भागात श्रीरामभक्त हनुमानाची प्रचंड मूर्ती असे रामदर्शन उभे केले. ह्यासाठी सहा वर्षे अविरत कष्ट घेतले.त्याचे हृदयंगम वर्णन त्यांनी दीपावली मासिकाच्या दिवाळी २००५ च्या अंकांत केले आहे. ते वाचून चित्रकूटला भेट द्यायची मला व सौ. स्वातीला इच्छा झाली. हायोग नुकताच जुळून आला. आम्ही भाऊ बहीण, वहिनी मेहुणे जावई असा १० जणांनी दिवाळी नंतर २७ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर२००६ दरम्यान मध्यप्रदेशचा दौरा केला. त्यामध्ये पहिली भेट चित्रकूटला होती त्याचा हा वृत्तांत.

आम्ही २८ ऑक्टोबरला संध्याकाळी सतना या स्टेशनला मुंबई हावरा (अलाहाबाद मार्गे) मेलने पोहोचलो.मध्य प्रदेश टूरिजम कॉरपोरेशनच्या बहरूट लॉजवर उतरलो. सुंदर लॉन, निशिगंध, गुलाबफुले, रातराणी ह्यांचा घमघमाट, छान खोल्या, छान भोजन, यांमुळे २० तास प्रवासाचा शीण कुठल्याकुठे निघून गेला. २९ तारखेला सकाळी ७ वा. आम्ही सतनाहून चित्रकूटला प्रयाण केले. रस्त्यामध्ये मोटरसायकलवरून जाणाऱ्या माणसाजवळ बंदूक दिसली.हा शिकारी आहे का असे मी ड्रायव्हर(गायकवाड- मूळचा मराठी)ला विचारले. त्याने सांगितले की हा भाग डाकूंचा टापू आहे. बहुलकरांच्या वर्णनाचा पहिला हिसका बसला!

चित्रकूटच्या हद्दीवर आम्ही दीड तासात पोहोचलो.डोंगराळ भाग, गवत ज्यास्त, पिके कमी, गुरांचे मोठे मोठे कळप रस्ता अडवून चालत होते. आमची गाडी ड्रायव्हरने डावीकडे आठ किमी वरिल गुप्त गोदावरीला वळवली. प्रभू रामचंद्रानी नाशिकच्या गोदावरीचे पाणी गुप्तरूपाने येथे आणले अशी आख्यायिका आहे. निसर्गाने नटलेला डोंगर पर्वतांचा भाग, त्यात गुहा- गुहेतून पाणी येत आहे. सुरुवातीला रामदरबार, आहे, सीता कुंड , धनुष्यकुंड आहे. गुहांचे छतावर नैसर्गिक रीत्या अप्रतिम कलाकृती तयार झाली आहे.

गुप्त गोदावरीहून आम्ही कामदगिरीला गेलो. त्याच्या पाच किमी परिघाला पायी प्रदक्षिणा करतात. आम्ही मात्र ती आमच्या गाडीत बसून केली. कामदगिरी देवळात रामाने राक्षसवधाची मनीषा देवदेवतांच्या पूजनाने केली.

जाताना गावागावातून दीनदयाळ उपाध्याय संस्थेचे कार्य दिसत होते. महिलांना शिवणकाम शिकविणारे क्लासेस, विद्यार्थ्यांसाठी कंप्यूटर क्लासेस ,शेती संशोधन व प्रयोगशाळा, दिसून येत होती. विधायक कार्य स्पष्ट दिसून येत होते.

कामदगिरीहून आम्ही स्फटिक शीला पहावयास गेलो. एका छोट्या टेकडीवर दगडावर राम सीतेची पाऊले उमटली आहेत. इंद्रपुत्र जयंताने सीतेशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला तो कावला होऊन तिच्या पायाशी मरून पडला अशी कथा आहे.

स्फटिकशीलहून आम्ही मुख्य आकर्षण- रामदर्शन-ला गेलो. डॉ. जयपूरिया शेठ यानीही ही सृष्टी उभारण्यास मदत केली. दर्शनी भागात श्रीरामभक्त हनुमानाचा प्रचंड पुतळा आहे. छाती फाडून हृदयात वसलेला राम आहे.
शेजारी दुमजली कलादालन आहे.त्यात लाओस(कॉंबोडिया, व्हिएटनाम, फ्रान्स, रशिया, म्यानमार, चीन, मुस्लिम इंडोनेशिया, थायलंड ह्या देशात रामायणाचा किती प्रभाव आजही आहे हे दाखविनारे साहित्य, नृत्य-नाट्य प्रसंग, दाखविले आहेत. लवकुश धनुर्विद्या शिकताना दाखविले आहेत. अनेक भित्तीशिल्पे, शेजारी रंगीत चित्रे- समर्पक फलक आहेत. रामाला वनवासात पाठविण्याच्या प्रसंगातील केकेयी अतिशय सुंदर दाखविली आहे. तर हताश दशरताचे चेहरयावरील हृदय पिळवटून टाकणारे भाव हुबेहूब दाखविले आहेत.रामायणातिल सुग्रीव वाली युद्ध, रामरावण युद्ध, सुवर्णमृग, सीताहरण,राक्षसांचा वध रामरावण दोघेच करू शकले असते. रामाची तशी इच्छा असूनही विश्वामित्रानी सांगितले की ते शाश्वत होणार नाही. स्थानिक लोकांच्या मनातील राक्षसांची भीती गेली पाहिजे. राक्षसांना स्वतः तोंड देण्याची त्यांची मानसिक तयारी केली पाहिजे. हेच दूरदृष्टीचे नेतृत्त्व दिले पाहिजे.भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांना देहदंडाची शिक्षा राक्षसांकडून बलात्कारित युवतींना समाजात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. अहिल्या गौतम ऋषींचे पुनर्मीलन, संतप्त परशुरामाचा क्रोध, रामाने नम्रतापूर्वक वागून शांत केला.रावणाने नाशिकच्या पंचवटीमधून सीतेचे अपहरण केले.भरतभेट-पादुका,जटायू घायाळ झालेला, बिभीषणाने रामाची बाजू घेतल्याने रावणाने त्याला हाकलून लावले. तो रामाला मिळाला. प्रजानिष्ठ रामराजा इ.इ. अनेक प्रसंग उत्कृष्ट कलाकृतितरून गुंफले आहेत. रामगर्शन पाहिल्याने चित्रकूटच व्हे तर मध्यप्रदेशच्या दौऱ्याची सफलता झाल्याची जाणीव झाली.

मा. नानाजी देशमूख गोंकांच्या सियाराम कुटीर येथे जेवणाच्या वेळेपूर्वी बसले होते. त्यांची आम्ही भेट घेतली. त्यांना वंदन केले. माझ्या भाऊवहिनींनी डोंबिवलीत त्यांना चतुरंग पुरस्कार दिला होता.त्यांनी खणखणित भाषण केले होते त्याची आठवण करून दिली. नानाजींनी आरोग्यधाम, बालोद्यान पाहिले का असे

विचारले. आम्ही ते पाहणार आहोत असे सांगून त्यांना पुन्हा वंदन करुन बाहेर पडलो.

आरोग्यधाम हे आयुर्वेदिक उपचार करणारे हॉस्पिटल आहे. रविवारची सुट्टी होती. आम्हाला आत जाता आले नाही. पण त्याचा परिसर अतिशय नयनरम्य होता. वाहते पाणी, बागा, लाल कौलारू इमारती, टप्प्या-टप्प्यांचे काम, सर्व लँडस्केपिंग इतके नयनरम्य होते की असे मी तरी कुठल्या हॉस्पिटलला पाहिले नाही व असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही की आजारी माणसाचा आजार आरोग्यधामचा परिसर पाहूनच बरा होईल. हॉस्पिटलमध्ये जाण्याची गरजच पडणार नाही. सर्वात उंच टेकडीवरील भोजनालयात ऐनवेळी दहा जणांना भोजन मिळाले.

तेथे औषधी वनस्पती आहेत, औषधे बनविण्याची रसशाळा व गोशाळा आहे. तेथे अकरा प्रकारच्या देशी गायींचे संवर्धन संशोधन केले जाते. आयुर्वेद रसशाळेत औषधे तयार करून ग्रामीण भागातील घराघरातून तो आजीबाईचा बटवा प्रसारित केला जात आहे.

ग्रामीण भागात महिलांच्या सुलभ प्रसूतीसाठी तेथील दायांना आधुनिक तंत्रज्ञानाने प्रशिक्षित करण्यात येते.

शेतीमध्ये रासायनिक खतांच्या ऐवजी जैवी खतांचा वापर प्रसारित करण्यात येत आहे. गाईचे पालन करून, बालकांना दूध, शेतीला बैल,जमिनीला जैविक खते, उपलब्ध करून दिली जातात.

ग्रामोद्योगाला चालना देण्यात येते. ग्रामीण भागात कच्चा माल उपलब्ध असतो. त्याचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी युवक युवतीना अद्ययावत प्रशिक्षण देण्यासाठी 'उद्यमिता' विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. स्वयंरोजगार उपलब्ध करून ग्रामीण भागातून शहराकडे जाणारा ओघ रोखण्याचे प्रयत्न होत आहेत.

नवविवाहित व सुशिक्षित पती पत्नीना चित्रकूट प्रकल्प साकार करण्यासाठी पाच वर्षे काम करण्याचे आमंत्रण देण्यात येते. त्यांना 'समाजस्वास्थ्य शिल्पकार' म्हटले जाते. खऱ्या अर्थाने विधायक कार्य चित्रकूटमध्ये चालू आहे. रम्य चित्रकूटच्या रम्य आठवणी घेऊन आम्ही संध्याकाळी सतनाला पोहोचलो.

=0=

प्रिय वाचक सदस्यांनो,

२४ पानी अंकाची संगणकीय अक्षर जुळणी श्री. सी. गो.खांबेटे यानी एकहाती विनामूल्य करून एक आदर्श निर्माण केला आहे. आपल्या परिवारात अनेक तरुण तरुणी याबाबतीत सहकार्याचा हात पुढे करून कामाचा वाटा उचलू शकतात व ई-मेल करू शकतात. तसेच व्यावसायिकांनी जाहिरातींचा आधार दिल्यास भरघोस मजकुराचे अंक यापुढेही देता येतील. परिणामी आपले हितगुज बहुविध विषयांना वाव देऊन व्यापक अर्थाने तमाम मराठ्यांचे हित साधणारे, हवेहवेसे वाटणारे, नियतकालिक होऊ शकेल. अन्यथा पृष्ठसंख्या पूर्वीप्रमाणे १६ वर आणावी लागेल. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्या.-संपादक

## हितगुज मध्ये प्रसिद्ध झालेले साहित्य

**कालखंड-१: अंक १७ ते ४०**

(१९९४ मार्च ते १९९९ **डिसेंबर** )

| अंक क्र शीर्षक | लेखक | कुपृ |
|---|---|---|
| **१७ १९९४ मार्च** | | |
| हितगुजच्या प्रकाशनाची स्वयंपूर्ण योज | कार्यवाह | |
| व्यावसायिक शिक्षणाच्या वेगवेगळ्या वाटा | सौ.नीलांबरी रमेश . | २८० |
| अजब गुन्हा अजब शिक्षण! | श्रीधर परशुराम | ९८ |
| **१८ १९९४ जून** | | |
| स्थानिक मेळावे व्हावेत | सौ. मीना माधव | १५९ |
| बिनभांडवली सेवाव्यवसायात प्रवेश शक्य | विनय वसंत | |
| पोहणे आपोआप येते. | सुरेश सखाराम | ३९९ |
| सहस्त्रचंद्रदर्शनी श्रीधर वामन फडणीस | अभिजित प्रभाकर | २२७ |
| आजोबा बंगाली शिकतात. | गजानन भास्कर | ४२७ |
| **१९ १९९४ सप्टेंबर** | | |
| फिनान्शियल कन्सल्टंट अभिजित | अभिजित प्रभाकर | २२७ |
| महिला पुरोहित नीला मराठे | नीला सदाशिव | ? |
| देशांतील वासनाकांड आणि जबाबदारी | सौ.जयश्री विनायक- | २२७ |
| **२० १९९४ डिसेंबर** | | |
| मुलांच्या आरशांतून पालक | आधारित | |
| एक तपाची वाटचाल | सुरेश सखाराम | ३९९ |
| काणी सोंवाराची (चित्पावनी भाषेत) | विनायक गोपाळ | ६९ |
| पदरखोचून..मिशांना पीळ देऊन. | गजानन भास्कर | ४२७ |
| देव भावाचा भुकेला (कविता) | सौ.शुभदा प्रभाकर | २२७ |
| अनोखे सासरे- कै.जगन्नाथ श्रीधर | सौ.सुमेधा प्रभाकर | १२० |
| मराठेकुलवृत्तांताचे आद्यसंकलक-परांजपे | अच्युत म.चक्रदेव | ७३२ |
| **२१ १९९५ मार्च** | | |
| शैक्षणिक मार्गदर्शन- काळाची गरज | सौ.नीलांबरी रमेश | २८० |
| आणि मज नव सृष्टी दिसली (कविता) | सौ. मालती विनायक | ६९ |
| अशी ही अमेरिका | सौ. अनुराधा मुकुंद | ९८ |
| भारताची सैन्यदले | रमेश भिकाजी | ३६५ |
| **२२ १९९५ जून** | | |
| हितगुजचा अपमृत्यू टळला | सुरेश सखाराम | ३९९ |
| सुजाण, आदर्श पालक व्हा. | सौ.नीलांबरी रमेश | २८० |
| संरक्षण संशोधन आणि विकास | रमेश भिकाजी | ३६५ |
| समतोल आहार | सौ.स्वाती हेमंत | ४७१ |
| **२३ १९९५ सप्टेंबर** | | |
| परिपक्वता- प्रथम पारितोषिक (कविता) | अनंत धोंडो खांबेटे | ६९८ |
| प्रगल्भता- द्वितीय पारितोषिक | कु. सीमा सुधाकर | ३६६ |
| परिपक्वता-उत्तेजनार्थ पारि. (कविता) | सौ. सुनीता जयंत | १८० |
| आहार आणि मधुमेह | सौ. स्वाती हेमंत | ४७१ |
| शिक्षणप्रेमी राजाभाऊ- दत्तात्रेय बा. | सौ. शुभदा श्री शिंत्रे | ३५८ |
| **२४ १९९५ डिसेंबर** | | |
| संरक्षण उत्पादन आणि स्वयंपूर्णता | रमेश भिकाजी | ३६५ |
| शिस्त आणि शिक्षा | सौ.नीलांबरी रमेश | २८० |
| अशीही एक आनंदयात्रा | गजानन भास्कर | ४२७ |
| रमणमहर्षी आणी परमहंस | श्रीधर परशुराम | ९८ |
| **२५** *पुणे अधिवेशन विशेषांक* **१९९६ मार्च** | | |
| सहकार्याचे आवाहन | सुरेश सखाराम | ३९९ |
| ५ व्या अखिल भा अधिवेशनाचा वृत्तांत | विनायक केशव | २० |
| योग यावा भेटीचा,पुनः पुन्हा,(कविता) | सौ. निर्मला श्रीपाद | ५५२ |

राष्ट्र उभारणीसाठी प्रयत्न हवे मुकुंद माधव २२१
स्त्री पुरोहित सौ. मंगला काशिनाथ १०८
जरा सरकता का ?,सरका ना हो प्लीज वामन गणेश ५०३
Creative व Constr कार्य दिशा पुष्कराज वामन ५०३
स्वातंत्र्य देणाऱ्या घरांची गरज सौ.नीलांबरी रमेश २८०
पोटाचे विकार आणि आहार सौ. स्वाती हेमंत ४७१
युद्धाचे तंत्र, मंत्र आणि शस्त्रास्त्रे रमेश भिकाजी ३६५
वास्तुशास्त्र श्रीकान्त माधव २३८
प्रतिष्ठान तर्फे सहनिवास योजनाराबवावी जनार्दन गोविंद ४०५
विसरलेला साप आणि तान्हे मूल गजानन भास्कर ४२७

**२६ १९९६ जून**

"देणाऱ्याचे हात हजार सुरेश सखाराम ३९९
कुलवृत्तांतात काय आहे ? लक्ष्मण शंकर ५२०
आठवणी दाटतात- गजानन चिंतामणी
एअर कमोडर म. कृष्ण यांची कामगिरी मधुकर कृष्ण ३२६
लठ्ठपणा आणि आहार सौ. स्वाती हेमंत ४७१

**२७ १९९६ सप्टेंबर**

अमेरिकेतल्या मराठ्यांचे नाट्यवेड विनायक गोपाळ ६९
नापास विद्यार्थी सौ.नीलांबरी रमेश २८०
सफल उद्योजक अच्युत गोविंद खांबेटे अच्युत गोविंद खांबेटे ६९७
संस्कृत -भारतीय संस्कृतीचा मूलाधार रमेश भिकाजी ३६५
अविस्मरणीय अमरनाथ यात्रा दत्तात्रय त्रिंबक ९२
षड्रिपू- शत्रू ? नव्हे मित्र श्रीधर परशुराम ९८
ब्यूटी पार्लरचा व्यवसाय सौ. सुनीता राजन ५१३

**२८ १९९६ डिसेंबर**

पर्यावरण विशेषज्ञ- डॉ. एकनाथ डॉ.एकनाथ व्यंकटेश ३८९
आजीचा विमानपरवास- वैकुंठप्राप्तीसाठी सौ. रोहिणी व ग.भा ४२७
स्वावलंबनाला उत्तेजन सौ.नीलांबरी रमेश २८०
कॅसेटचे फायदे सुधाकर जनार्दन ४५
शांपू- समज आणि गैरसमज सौ. सुनीता राजन ५१३
संस्कृत प्रतिष्ठानच्या कार्यकक्षेत नाही चिंतामण त्र्यंबक २४८
संस्कृतचा प्रसार होणे गरजेचे आहे लक्ष्मण पांडुरंग ५४३
हास्य (कविता) सुलभा अनिल ३२९

**२९ १९९७ मार्च**

१८ व्या वर्धापन समारंभाचा वृत्तांत रोहित प्रमोद ५१३
५व्या वर्षी झांशी ते मुंबई एकटीने प्रवास सौ.उषा बा खेर ११०
लघुउद्योजकांचे दीपस्तंभ-मधुसूदन मधुसूदन रा खांबेटे ६९५
आदर्श माता सौ. मीनाक्षी रवींद्र २२०
इलेक्ट्रोलिसीस- थर्मोलिसीस सौ. सुनीता राजन ५१३
मुलांसाठी फुरसद मानसिक गरज सौ.नीलांबरी रमेश २८०

**३० १९९७ जून**

६ वे संमेलन, रत्नागिरी- निमंत्रण कार्यवाह
खेळकर उद्योगी कुटुंब-(पृ.२७९) लक्ष्मण शंकर ५२०
कलादर्शन मेळावा-२४-५-९७ सदानंद विष्णू ५०७
अथा तो सर्पजिज्ञासा राहुल रमेश ३६५
चांगलेच बघण्याचा चष्मा वृशाली संजीव
मुलानाही स्वतंत्र व्यक्तिमत्व सौ. मीना सदानंद ४१७
बालवयातच योग्य संस्कार हवे सदानंद प्रभाकर ६५८
मातेचे वागणे आदर्श असेल तर .. सौ. शीला विलास २३५
मातेने मुलांशी मैत्रीचे नाते जोडावे. सौ. शुभदा पांडुरंग ७४७

**३१ १९९७ सप्टेंबर**

खुडीपाटकरांनी भोगलेला महापूर वसंत रावजी ११७
मला आपले हे गाढवच आवडते सौ.उषा बाळकृष्ण ११०
स्वयंव्यवसाय मेळावाः अंधेरी १९-७-९ कार्यवाह
स्वयंव्यवसाय मेळावाः मुलुंड ३०-८-९७कार्यवाह

**३२ रत्नागिरी संमेलन विशेषांक१९९७ डिसेंबर**

अध्यक्ष सुरेशभाऊ यांचे प्रास्ताविक ३९९
स्वा. श्री कमलाकर मराठे यांचे भाषण कमलाकर नरहर ४६
संमेलन वृत्तान्त विनायक केशव २०
उद्योगविषयक मार्गदर्शनाचा वृत्तान्त श्रीपाद माधव (अण्णा) ४६
दूरदर्शनवरील वृत्तनिवेदन सौ. मंजिरी श्रीनिवास ३१२
संमेलनाच्या यशाचे शिल्पकार भास्कर नरहर ४६
कुलबांधवांचे करमणुकीचे कार्यक्रम सदानंद विष्णू (भाऊ) ५०७
मराठे प्रतिष्ठानःपुढील वाटचाल-चर्चेसाठी टिपण लक्ष्मण शंकर ५२०
उपस्थित कुलबांधवांच्या प्रतिक्रिया लक्ष्मण शंकर ५२०
त्रयस्थ ऑब्झर्वर आले- कुटुंबीय होऊन गेले लक्ष्मण शंकर ५२०
रत्नागिरीतिल ' स्नेह ' संमेलन सौ.मीनाक्षी रवींद्र मराठे २२०
कोकण रेल्वे- साकारलेले स्वप्न शं.द.लिमये चीफइंजि.को.रे
कोकण रेल्वे-काही अनुभव जनार्दन यशवंत ४२६
कोकणची माणसे रमाकांत माधव ६२३
कोकणातील उद्योग विकास(चर्चेसाठी टिपण) लक्ष्मण शंकर ५२०
नर्सरी व्यवसाय सुरेश पांडुरंग ३२३
व्यवसाय पुराण वामन गणेश ५०३
सहज करता येणारे सेवा उद्योग आधारित
सिंधुदुर्ग जिल्हा- पर्यटन जिल्हा घोषित आधारित
मराठे कुलांविषयी सामान्य माहिती कुलवृत्तान्तावरून
मराठे कुलवृत्तान्तातील घराणी,पिढ्या,इ.कुलवृत्तान्तावरून
काणी सोव्वाराची-(चित्पावनी भाषेचा नमुना) विनायक गोपाळ ६९
जीवनधारा- पारितोषिकप्राप्त कथा) विठ्ठल महादेव २३५
घर (कविता) सौ.गायत्री गणेश जोशी ६७६
छत्रीचं फूल (कविता) कु.ऋता संजय करमरकर ५२०
मराठे संमेलनाची ' गावाकडची गोष्ट ' श्रीपाद माधव (अण्णा) ४६
बेस्टः नारी, नोकरी, निवारा, आणि खूप काही गजानन भास्कर ४२७
रसिक (कविता ) मोरेश्वर हरी ५४२
परि विसरू नको आम्हाला (कविता ) हेमंत यशवंत २९
संसार (कविता ) श्री. मैना(मनोरमा) गोविंद २३०
मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह-श्री.प.(भाऊसाहेब)
गोमंतकातील गणमान्य मराठे कालिदास बाळकृष्ण ५४१
मराठे उद्योगाची ती पिढ्यांची ' स्विफ्ट' वाटचाल सुरेश सखा. ३९९
तीन पिढ्या सराफी : मे यशवन्त विठ्ठल आनंद यशवन्त २७७
तीन पिढ्यांचे साप्ताहिक किरात श्रीधर केशव ३९६
तीन पिढ्यांची संस्था- श्रीगंधर्व महाविद्यालय सुधाकर जनार्दन ४५
मी अनुराधा आणि माझी मुलगी अंजली सौ. अनुराधा मराठे २९७
मूकबधिरांसाठी झटणारी सौ. सीमा संजय मुळ्ये ३२३
स्वयंव्यावसायिक सौ. स्वाती श्रीपाद ३१

**३३ १९९८ मार्च**

सेवा व्यवसाय सुरेश सखाराम ३९९
१९ व्या वर्धापनदिन समारंभाचा वृत्तान्त प्रमोद विष्णू ५१३
आदर्शमाता श्रीम.राधाबाई बाळकृष्ण सौ.कमला वा.ताम्हणकर ५४१
कृतज्ञता-(कविता) शुभदा व संतोष मधुकर
आदर्श माता- निशा भालचंद्र मराठे सौ.अर्चना अ. कुळकर्णी

नृत्यालंकार सौ. मंजिरी देव गजानन भास्कर ४२७
अशी माझी पुतणी-सौ. अरुंधती अशोक वाड सौ. सुमन नारायण
निवडणूक (कविता) सौ. स्वाती ग अभ्यंकर १५५
कर्तव्यदक्ष माता-सौ. प्रतिभा प्रभाकर सौ. प्रज्ञा प्रशान्त पिटकर १०१
प्रतिभेची जपणूक्-(नवनिर्मितिक्षमता) सौ. नीलांबरी रमेश २८०

**३४ १९९८ जून**

तुम्ही काय निकाल द्याल? सुरेश सखाराम ३९९
आदर्श मातेचे मनोगत राधाबाई बाळकृष्ण ५४१
वसन्तगौरव-ऋतुउत्सव विनायक केशव २०
साध्याही विषयात आशय कधी, अनन्त धोंडो खांबेटे ६९८
उद्योजक सहाय्यक योजना जनार्दन गोविंद ४०५
सौंदर्यप्रसाधनेतील पुरुषांचा वाटा. सौ. सुनिता राजन ५१३
मी असा घडलो कमलाकर अ.जाईल ७५७
सलवार कुडता व मराठी भगिनी सौ. आशा वि.चक्रदेव ७२८
आयुर्वेद विचार वै. रामचंद्र शिवराम ४०
१० वी व १२वी नंतर पुढे काय? आधारित
२१ व्या शतकात येणारे नवीन व्यवसाय आधारित
अमेरिकन स्कॉलर मॉरिन एल.पी. पॅटर्सन संकलित

**३५ १९९८ सप्टेंबर**

आर्थिक विकास आणि भारताची बलस्थाने सुरेश सखाराम ३९९
मायेचा वटवृक्ष- रामचंद्र पुरुषोत्तम श्रीम. शुभदा पां.जोशी ७४७
अमृतमहोत्सवी नाना-गणेश परशराम सौ. सुहासिनी नारायण १८
माझ्या शब्दात मी: लेन्स तज्ज्ञ सौ.कुंदा मराठे गणात्रा१३२
उद्योग त्रिमूर्ती प्रकाश, सुहास, सतीश मराठे प्रकाश श्रीधर १९
नैसर्गिक खतांसाठी जैविक तंत्रज्ञान- गटचर्चा विनायक केशव २०
कुलवृत्तान्त कशासाठी ? वरुणराज चिं. भिडे
कुलवृत्तान्त -राष्ट्रीय कर्तव्य इ. हृषिकेश कृष्ण पेंडसे
सासूची धास्ती अनन्त धोंडो खांबेटे ६९८
हसरे हितगुज गजानन भास्कर ४२७

**३६ १९९८ डिसेंबर**

नागपूरकर मराठ्यांचे (विभागीय) संमेलन प्रभाकर केशव ३५५
१६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त विनायक केशव २०
न्या. रा. के. रानडे- निवडक सुविचार सुरेश सखाराम ३९९
सासवा सुनांचेच नव्हे, शब्दांचेही दिवस अनन्त धोंडो खांबेटे ६९८
स्मृति सुगंध गजानन भास्कर ४२७
चकवा विठ्ठल महादेव २३५
शुभ बोल नाऱ्या अश्विनीकुमार दत्तात्रय २७०
केवड्याचे कणीस श्रीपाद माधव (अण्णा) ४६
द क्षिण कन्नडातील चित्पावन एम्. प्रभाकर जोशी

**३७ १९९९ मार्च**

अध्यक्षांचे आवाहन सुरेश सखाराम ३९९
डॉक्टरांशी हितगुज-कर्करोग आणि ॲनेस्थेशिया विनायक केशव २०
वाचनीय चिंतामणि त्र्यंबक २८८
दाद बोरिवलीची- १३-२-१९९८मेळावावृत्तान्त विनायक केशव २०
पुण्याच्या २०व्या वधा.२६-१-९९वृत्तान्त सौ. माधवी क.जाईल ५७
चिंता नको, चिंतन हवे वामन गणेश ५०३
नागपूर मराठे संमेलन १०-१-१९९९ वृत्तान्त प्रभाकर केशव ३७२
विलंब : आपल्या प्रगतीचा शत्रू श्रीधर परशुराम
कच पक्ष नाही पुरणार (कविता) सारिका भास्कर २०
पदर मीनाक्षी अंकलीकर ६९८
सदूभटजी विनायक केशव २०
हसरे हितगुज - रसिक रिक्षावाला गजानन भास्कर ४२७
गुरू सौ. माधवी क.जाईल ७५७

**३८ १९९९ जून**

बोरिवली मेळावा अध्यक्षीय भाषण२४-४-१९९९सुरेश सखाराम३९९
असा बनला आपला लोगो राजाराम नारायण(राजा) २३५
पेपर वाचून ज्ञान मिळवा ,पेपर विकून दुवा मिळवाहेमन्त महादेव ४७१
शिक्षण समितीचे विद्यार्थीवर्गाला आवाहन डॉ.सुरेन्द्रनाथ गणेश २८४
वैद्यकीय समिती - निमंत्रकाचे मनोगत डॉ. शरद दत्तात्रय ४१७
आपले आरोग्य-सर्दी पडसे, खोकला. डॉ. शरद दत्तात्रय ४१७
प्रतिष्ठानचे सांगलीतीलवधुवर माहितीकेंद्र सौ.गायत्री गो लेले २३५
वसंतगौरव- ८ मे १९९९ विनायक केशव २०
मधुमती(-पाकिस्तानी जहाज):कारवाई -कै.गजानन अभ्यंकर कमांडर(नि) १५५
श्रद्धांजली- पती गजानन अभ्यंकर यांस स्वाती ग. अभ्यंकर १५५
पानवाला वामन गणेश ५०३
रेडिओ इ. इनस्टिट्यूटच्या संचालिका शालिनीबाई ५२०
काय हा योगायोग? लिंकन आणि कॅनेडी सुरेश सखाराम ३९९
सासू-सून: संसारातील शीतयुद्ध गजानन भास्कर ४२७

**३९ १९९९ सप्टेंबर**

हे दुष्टचक्र कधी भेदणार? अरुण टिकेकर संपा.लोकसत्ता)
मधुमेह- उपचार व आहार डॉ. अरविंद व अनुराधा गोडबोले
७५वर्षाच्या विक्रम फा.चे कै. विष्णुपंत मराठे -मधुसूदन लेले
हजरजबाबीपणा- गडकरी व अत्रे यांचा सुरेश सखाराम ३९९
परीक्षा राजाराम नारायण (राजा) २३५
हसरे हितगुज- मूर्खाला वाट न देणारा शहाणा आधारित
आयुर्वेदीय सिद्ध औषधे वै. रामचंद्र शिवराम ४१
मृगजळ विठ्ठल महादेव २३५
ऑ फिस ? छे, गजानन भास्कर ४२७
वृद्धाश्रम- गोंडस नावाचे अडगळीचे घर वामन गणेश ५०३
अनोखी आचारसंहिता- ज्येष्ठांसाठी वामन आत्माराम ३६६
चारोळ्या (कविता) कु. सायली सतीश ५५३

**४० १९९९ डिसेंबर**

या युवकांना झालंय तरी काय? शशांक श्रीधर ३९६
अनुकरणीय चिंतामण महादेव २२२
१७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त विनायक केशव २०
बुद्ध ,सुबुद्ध , वृद्ध ( आवडलेली कविता) वामन आत्माराम ३६६
संगणकाची समस्या- वाय टू के सुधीर कृष्णाजी चक्रदेव ७३१
मराठे परिवार-व्यक्तिसूची (मध्यप्रदेश)सीताराम गोपाळ खांबेट ६७६
हे दुष्टचक्र - मतदान बंधनकारक असावे हेमन्त अरुण २१
उमेदवार सूज्ञ व सुसंस्कारित असावे वसंत रावजी ११७
शिपायापेक्षा मंत्री होणे सोपे सुरेश सखाराम ३९९
वेडं मन (कविता) सारिका भास्कर २०
जपामध्ये वेगळं काय आहे? यशवंत लक्ष्मण १०१
प्रायश्चित्त विनायक केशव २०
वृक्षाचे मनोगत (कविता) सौ. मानसी सचिन ४६
शरद ऋतु (कविता) श्रीम. मीनाक्षी अंकलीकर ६९८
जीवनाचे सार्थक मीननाथ लक्ष्मण २८०
चारोळ्या (कविता) कु. सायली सतीश ५५३
चालणारे प्रेत गजानन भास्कर ४२७
अडगळीचं घर नव्हे, आनंदभुवन राजाराम नारायण (राजा)२३५


-०००-

## या अंकात


पृ.

१. संपादकीय भूमिका १
*-डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे , वडाळा*

२. पुणे शाखा दैनंदिनी प्रकाशन व वर्धापन दिन कार्यक्रमाचे जाहीर निमंत्रण-*सौ. नीलांबरी मराठे, पुणे* १

३. डिप्रेशन-महिलांची मानसिक व्यथा (उत्तरार्ध) ४
*-डॉ. सौ.सीमा श्याम मराठे, पुणे*

४ मदतीसाठी विनम्र आवाहन ५
*-संजय केशव खांबेटे ,म्हसळे,*

५ Famous Quotes ५
*-Ramakant M. Vidwans, Mahim*

५. You have no mail ! Good ६
*-Ramakant M. Vidwans, Mahim*

६. मनुविस्मृती ७
*-मनोहर दामोदर मराठे, अंबरनाथ*

७. विद्यार्थी मित्र राष्ट्रपती ७
*-ल. शं. मराठे , मुलुंड*

८ सात भौगोलिक सत्ये ७
*-मोहन सदाशिव मराठे, खार.*

९. दोन कविता : १ दूरध्वनी . २. चारोळ्या ८
*-डॉ.सीमा श्याम मराठे, पुणे*

१०. हसरे हितगुज ८
*-गजानन भास्कर मराठे, घाटकोपर.*

११ ओम पर्वत आणि आदि कैलास पदयात्रा ९
*-विंग कमांडर (नि) यशवंत लक्ष्मण मराठे, पुणे*

१२. अखंड भारतः संतांचे एक मार्गदर्शन १०
*-अजित लक्ष्मण मराठे, खोतोडे, गोवा*

१३. मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके ०५-०६ ११

१४. गीतरामायणाचा संस्कृतानुवाद-ग्रंथपरिचय १२
*-सी.गो.खांबेटे , अंधेरी*

१५ सदस्य-संवाद १३
*-सी.गो.खांबेटे , अंधेरी*

१६. मी जावई मराठ्यांचा! १६
*-डॉ.गिरीश जाखोटिया , विलेपार्ले*

१६ आगामी अंकात काय वाचाल? १७

१७. विवाह पूर्व मार्गदर्शन-काळाची गरज १८
*-सौ. मंगला प्रवीण मराठे ,गोरेगांव प.- मुंबई*

१८. तिरुपति बालाजी-तुज सगुण म्हणू की निर्गुण रे १९
*-डॉ.सौ. शशिकला चिंतामणि मराठे, पुणे.*

१९ हितगुजची वाटचाल-कहाणी २५ वर्षांची १९
*-सी.गो.खांबेटे , अंधेरी*

२०. चला चला चित्रकूटला २०
*-मोहन सदाशिव मराठे, खार.*

२१. श्रीदत्तजन्मकथा १४
*-डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे , वडाळा*

२२. हितगुजमध्ये प्रसिद्ध झालेले साहित्य-सूची २१
*-सी.गो.खांबेटे , अंधेरी*

२३. **या अंकात (अनुक्रमणिका)** २४

याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२), सभासद वृत्त(पृ.३) इ. नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

If undelivered, please return to:


**मराठे प्रतिष्ठान**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.**

**(टे. नं. २४३०२४५३)**